


# Sex Workers Organising for Change

## Self-representation, community mobilisation, and working conditions

GAATW Global Alliance Against Traffic in Women

# लैंगिक कामगारांचे परीवर्तनाकरिता संघटन : स्वयं-प्रतिनिधित्व,समूह चालना व कामाची परिस्थिती

**भारत**

**मधू भूषण**

महाराष्ट्रास्थित असलेल्या व्हॅम्प या लैंगिक कामगारांच्या स्वतंत्र सामुदायिक संघटनेच्या लघुसंशोधनात्मक अभ्यासातील या प्रकरणात, भारतातील वेश्याव्यवसाय व मानवी तस्करीचा गुंतागुंतीचा इतिहास व सद्यपरिस्थिती, या दोन्हींचे अविभाज्यीकरण करणाऱ्या कायदेशीर व नैतिक संस्था, यामुळे लैंगिक कामगारांवर होणारे परिणाम, शोषण व अत्याचाराच्या अंतर्गत समस्या तसेच समाज, पोलीस व मानवी तस्करी विरोधी संस्थाच्या कामातून निर्माण झालेल्या कलंक, गुन्हेगारीकरण या बाह्य समस्यांचा सामना करण्याकरिता त्यांनी विकसित केलेल्या पद्धती, व्याख्या व प्रतिक्रिया समजून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

साम्राज्यवादापूर्वीच्या काळात उत्क्रांत पावलेला वेश्याव्यवसाय, त्याचा जातीव्यवस्था व स्थानिक संस्कृतींशी असलेला परस्परसंबंध, साम्राज्यवादाच्या काळात या व्यवसायावर झालेले परिणाम व त्याचे कायद्याने केलेले व्याख्या व नियंत्रण तसेच जागतिकीकरणाच्या व आर्थिक शिथिलीकरणाच्या संदर्भामुळे लैंगिक काम व मानवी तस्करीमध्ये झालेले मुलभूत परिवर्तन यांचा मागोवा घेण्यातून या अभ्यासामागील व्यापक पार्श्वभूमी प्रस्थापित केली गेली आहे. व्हॅम्प च्या कामातील निरनिराळया आयामंबाबत व विचारधारांबाबतची माहिती तसेच वैयक्तिक कहाण्या गोळा करण्याकरिता या सामुदायिक संघाची उपस्थिती असलेल्या तीन नगरांमधील लैंगिक कामगारांशी केंद्रीक गटचर्चा व वैयक्तिक मुलाखती, तसेच संग्राम व कसम या संस्थांच्या प्रतिनिधींच्या मुलाखती व त्यांच्या व्याख्येनुसार मानवी वाहतुकीच्या समस्या हाताळताना पोलीस व कायदा यंत्रणेतील ज्या प्रतिनिधींशी त्यांना संपर्क करावा लागतो त्यांच्या मुलाखती, ही पद्धत प्रामुख्याने वापरली गेली.

लैंगिक कामगारांचे हक्क मिळवून देण्याच्या कामात वापरत असलेल्या बहुअंगी पद्धतीमध्ये, अन्य घटकांसोबतच, समुदायांमधील संघर्ष व अत्याचार तसेच मानवी तस्करीचे प्रश्न सोडविण्याकरिता निर्माण केल्या गेलेल्या तंटा मुक्ती समित्या, लैंगिक कामगार व त्यांची मुले यांचे शिक्षण व सक्षमीकरण करण्याकरिता मित्र हा उपक्रम, तसेच अन्य सामाजिक चळवळीबरोबर सातत्यपूर्ण संपर्क या पद्धतींचा समावेश आहे. त्यांचे समर्थनात्मक काम हे संग्राम व कसम यांच्या सहयोगाने केले जाते ज्याद्वारे त्यांचा आवाज व दृष्टीकोन, त्यांच्या आयुष्यावर व काम करण्याच्या हक्कांवर परिणाम करणाऱ्या कायदा व धोरणनिश्चितीच्या प्रमुख प्रक्रियांपर्यंत पोहोचवला जातो.

लैंगिक कामगारांच्या स्वनियोजित समुहांचे बळकटीकरण करणे व समूहांतर्गत तसेच बाह्य प्रस्थापित समाजाला आव्हान देऊन सुयोग्य कायदेशीर व राजकीय धोरणांमधून आपले हक्क जपले जातील असे बदल घडवून आणण्याकरिता त्यांच्यामध्ये वाटाघाटी करण्याची क्षमता वाढवणे, ही संग्राम व व्हॅम्प ची केंद्रभूत रणनीती परिणामकारक व सक्षम ठरली आहे यात शंका नाही. एकीकडे मानवी तस्करी विरोधी गटांच्या धाडी व सोडवणुकीच्या आघातपूर्ण प्रक्रियांचा सामना करत असतानाच लैंगिक व अन्य प्रकारच्या शोषणात्मक कामांमध्ये होत असलेल्या मानवी तस्करीची समस्या आपल्या अनुभव व समजुतीनुसार हाताळणेही त्यांना जमले आहे. त्याचा एवढा परिणाम झाला आहे की आज पोलीस व न्यायिक यंत्रणांनीही हे मान्य केले आहे की मानवी तस्करीच्या गुन्ह्यांकरिता लैंगिक कामगारांचे गुन्हेगारीकरण न करणारे किंवा त्यांना असमंजस न ठरवणारे निराळे कायदे निर्माण करण्याची गरज तर आहेच पण त्याचबरोबर मानवी तस्करीविरोधी लढ्यामध्ये त्यांना सहयोगी मानण्याची देखील तितकीच गरज आहे. ही मान्यता अनेकदा दुबळी ठरून मोडून पडते हेही खरे असले तरी मानवी तस्करी व लैंगिक कामासंबंधीच्या प्रस्थापित विवेचनास आव्हान देऊन व बदल करून त्यात त्यांची सद्यपरिस्थिती व त्यांचे हक्क सामावून घेण्याकरिता चाललेले त्यांचे सामुहिक प्रयत्न मात्र स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयजागतिक पातळीवर तितक्याच ताकदीने व सातत्यपूर्णतेने सुरु आहेत.

सार्वजनिक उद्दिष्टामागील वैयक्तिक भूमिका

या संशोधनातील शोधप्रणाली ही स्त्रीवादी सहभागी कृती संशोधनाच्या तत्वांवर आधारित असल्याने सुरुवात म्हणून, तसेच माझ्या स्वतःच्या वस्तुनिष्ठतेचे व आत्मनिष्ठतेचे स्त्रोत स्पष्ट करण्याकरिता म्हणून, काही वैयक्तिक प्रकटीकरण या ठिकाणी उचित ठरेल असे वाटते. सत्तर व ऐंशीच्या दशकांतील स्वायत्त स्त्री चळवळीमधून माझी उपज झालेली असली तरी वेश्याव्यवसायाकडे, "पुरुषप्रधान समाजामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे एक स्वरूप" या दृष्टिकोनापासून ते प्रस्थापित आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवस्थांकडून अनेकदा आधीच शोषित असलेल्या जाती, वर्ग व समुदायांतील स्त्रियांनी उपजीविकेचे साधन म्हणून केलेली निवड, अशी त्याविषयीची समज बनण्याएवढा लांबचा पल्ला या प्रवासात मी गाठला आहे. नव्वदच्या शतकाच्या मध्यावर मला भेटलेल्या, माझ्या या संशोधनाच्या केंद्रस्थानी असलेल्या व्हॅम्प संघटनेच्या या स्त्रियांनी वेश्याव्यवसाय व लैंगिक कामाविषयीची माझी समज नव्याने घडविण्यात तसेच आत्मसन्मान व हक्कांकरिता समूहबांधणी व समुदाय रचनेच्या एका जैविक प्रक्रियेतून त्यांनी उभारलेला कडवा संघर्ष जाणून घेण्यात एक मुलभूत भूमिका बजावली आहे. हे धडे, बंगलोरस्थित असलेल्या व २००० च्या दशकाच्या सुरुवातीस झालेल्या तिच्या स्थापनेपासून माझा संबंध असलेल्या, "साधना" या रस्त्यावरील स्त्रियांच्या, तुलनेने लहान असलेल्या संघटनेतील स्त्रियांबरोबरील संवादामुळे अधिक खोलवर रुजले गेले. व्हॅम्प ला जन्म दिलेल्या संग्राम या संस्थेची संस्थापिका मीना शेषु ही माझी शालेय जीवनापासूनची मैत्रीण असून वैयक्तिक व राजकीय या दोन्ही पातळयांवर आम्ही अत्यंत लांब तसेच खडतर प्रवास एकत्र केलेला आहे. कारण यामध्ये जसे आम्हा दोघींनाही जिव्हाळयाच्या असलेल्या अनेक विषयांवरील आमची मतभिन्नता, मतभेद व वादविवाद समाविष्ट आहेत तसेच तिचा मोकळेपणा व दिलदारपणा, तिची ठाम राजकीय मतप्रणाली व अनेक दशके ज्यांच्यासोबत तिने प्रवास केला आहे त्या स्त्रियांशी असलेली तिची दृढ बांधिलकी या सर्वांविषयी मला असलेले प्रेम व आदर यांचाही समावेश आहे.

मीना व व्हॅम्प या दोघांनीही मला स्त्रीकडे एक बळी म्हणून पाहणाऱ्या स्त्रीवादी नैतिकतेचा चष्मा उतरवून भांडवलशाही पुरुषप्रधान संरचनेत तग धरून राहिलेली एक व्यक्ती म्हणून पाहायला उद्युक्त केले. म्हणूनच ती चौकट पूर्णपणे मोडीत न काढता, लैंगिक कामगारांच्या किंवा नैतिकतेच्या मापदंडाच्या व प्रस्थापित विवाहसंस्थेच्या बाहेर जगणाऱ्या या स्त्रियांच्या जीवन प्रवासंमधून मला त्या चौकटीत अधिक भर घालता आली व तिच्या समजेचा परीघ अधिक रुंदावता आला; ही भर केवळ त्यांच्या यातनांतूनच घातली गेली नव्हती तर त्यांनी मिळविलेल्या बळातून व दृष्टिकोनांतून देखील घातली गेली.

हे संशोधन आणखी एका सहप्रवासीमुळे देखील अधिक समृद्ध झाले. शकून मोहिनी, जिचा साधना संघटनेची निर्मिती व संवर्धन करण्यात सहभाग होता, तसेच माझ्या क्षेत्रभेटी, मुलाखती व केंद्रीक गटचर्चा यामध्ये देखील ती सामील झाली होती.

सामुदायिक सहप्रवास व वैयक्तिक साक्षात्कार असेच सुरु राहोत!!

आणि सर्व लैंगिक कामगार समूहांकरिता .......

बोला, कारण तुमचे ओठ मुक्त आहेत
बोला, कारण तुमची जीभ अजूनही तुमचीच आहे
बोला, शरीर तुमचे स्वतःचे आहे
बोला, कारण आयुष्य अजूनही तुमचेच आहे

बोला, हा थोडासाच वेळ देखील पुरेसा आहे
बोला, सत्य अजूनही जीवित आहे
बोला, जे बोलले गेलेच पाहिजे

फैझ अहमद फैझ

**प्रस्तावना**

**राष्ट्रीय संदर्भ**

भारत हा विविध संस्कृती, विभिन्न वास्तविकता, इतिहास व अर्थव्यवस्था असलेला देश आहे. ही विविधता वेश्याव्यवसाय किंवा ज्याला बोली भाषेत धंदा[1] म्हटले जाते, त्यातही दिसून येते, ज्याला स्वतःला देखील वैविध्यपूर्ण इतिहास लाभला आहे व ज्याची विविध स्वरूपे, लिंगभाव, जात, धर्म, वर्ग याबरोबरच कलेसारख्याही विविध घटकांशी जोडलेली आढळतात. परंतु या बहुविध वास्तविकतेचे एकीकडे साम्राज्यवाद, शहरीकरण व जागतिकीकरणातील तार्कीकतांनी, तर दुसरीकडे प्रस्थापित कायदेशीर, सांस्कृतिक व नैतिक व्यवस्थांनी, पद्धतशीरपणे एकजिनसीकरण करून तिचे अधिकाधिक अवमूल्यन, कलंकीकरण व गुन्हेगारीकरण केले आहे. विवाहसंस्था व तत्कालीन प्रचलित अर्थसंस्थांची "काळी छाया" म्हणून उत्क्रांत पावलेल्या या संस्थेवर, या एकजिनसीकरणाच्या प्रक्रियेचा काय परिणाम झाला आहे व त्यामुळे कायदा व सार्वजनिक समजेमध्ये लैंगिक काम हे मानवी तस्करीच्या गुन्ह्यापासून, ज्याची व्याख्या काहींनी "बेकायदेशीरपणे केलेली वस्तू व व्यक्तींची खरेदी-विक्री" अशी केली आहे, कसे अविभाज्य गणले जाते हे आपण या प्रकरणामध्ये पाहणार आहोत.

**जनसांख्यिकीय दृष्टीक्षेप**

जून २०१७ मध्ये भारताची लोकसंख्या १.३४ अब्ज होती ज्यामध्ये ६५२ दशलक्ष स्त्रिया व ६९६ पुरुष असून राष्ट्रीय लिंगप्रमाण ९४५[2] एवढे होते. अनुसूचित जातीतील, अर्थात दलित, लोकसंख्या १६.६% एवढी होती तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ८.६% होती ज्यांना ऐतिहासिक काळापासून भेदभावात्मक वागणूक मिळालेली आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती हे गट भारतीय संविधानामध्ये ऐतिहासिक काळापासून वंचित राहिलेले गट म्हणून नमूद केलेले आहेत[3]. सर्वाधिक लोकसंख्या "हिंदू"[4] धर्माची असून उर्वरित लोकसंख्येमध्ये मुस्लीम, ख्रिश्चन,पारसी, बौद्ध, जैन इ.चा समावेश आहे. भारतामध्ये १२२ प्रमुख भाषा असून १५९९ उपभाषा किंवा बोलीभाषा आहेत.

या सर्वांतून एका जैविक व असाधारण विविधतेला खतपाणी मिळते जी वरून येणाऱ्या केंद्रीय पद्धतीच्या अनुशासनास आव्हानात्मक ठरते परंतु प्रत्यक्ष जमिनीवर मात्र यामुळे स्वायत्त, लोकशाही स्व-अनुशासन पद्धतींना आवश्यक ते अवकाश प्राप्त होते जे, लैंगिक कामगारांसह वंचित गटांना, अधिक उपलब्ध असते.

---

[1] या अभ्यासामध्ये वेश्या, व्यवसाय व धंदा या संज्ञांचा स्थानिक व जागतिक संदर्भ स्पष्ट करण्याकरता तसेच धंदा करणाऱ्या स्त्रिया स्वतःची व स्वतःच्या कामाची ज्या निरनिराळया प्रकारे व भाषांमध्ये ओळख करून देतात, त्यामागील त्यांच्या विविध रणनीतींची दखल घेण्याकरिता, गरजेनुसार वापर केला आहे. तसेच ज्या संघटनांनी व संस्थांनी वेश्या ही संज्ञा पुनःप्राप्त करून तिच्यात अंतर्भूत असलेला कलंक नाहीसा करण्याचा प्रयत्न केला आहे त्यांचीही दाखल घेण्याचा हा प्रयत्न आहे. ज्याप्रमाणे VAMPने सुरुवातीच्या काळात आपल्या नावात वेश्या या शब्दाचा समावेश केला आहे--"वेश्या अन्याय मुक्ती परिषद".

[2] Population of India 2017, *Indiaonlinepages.com,* available at http://www.indiaonlinepages.com/population/india-current-population.html.

[3] भेदभावात्मक जातीव्यवस्थेवर आधारित असेलेल्या सनातन हिंदू धर्मग्रंथ व चालीरीतींमध्ये अनुसूचित जमातींना "अस्पृश्य" मानले जात होते. अनुसूचित जमाती या जातिव्यवस्थेच्या बाहेर असून रक्तसंबंधांवर आधारित नाती, व्यवच्छेदक चालीरीती व संस्कृती व उपजीविकेच्या पद्धतींनी बांधलेल्या होत्या. त्या बहुतांशी सर्वसाधारण समाजापेक्षा दूर राहत असून अधिकतर जंगलांमध्ये राहणाऱ्या किंवा फिरस्त्या होत्या.

[4] "हिंदू" हे मी अवतरण चिन्हांत घातले आहे कारण राज्यसंस्थेने हिंदू धर्माची केलेली एकजिनसी व्याख्या मला मान्य नाही. बहुविध समुदाय व त्यांच्या विभिन्न चालीरीती व प्रथांचा तो समुच्चय होता व आहे, ज्यांना बळजबरीने एकत्र केले गेले आहे. उदा. अनेक दलित व आदिवासी निसर्गाधारित श्रद्धांना प्रचलित हिंदू धर्मात आणले गेले आहे.

**ऐतिहासिक दृष्टीक्षेप**

साम्राज्यवादाची प्रक्रिया जेवढी बाह्य तेवढीच अंतर्गत देखील होती. जाणाऱ्या साम्राज्यवाद्यांकडून एकीकडे जरी संविधानात्मक लोकशाही सारख्या कायदेशीर, सामाजिक व राजकीय संस्था पुनर्रचित स्वरुपात इथल्या "असंस्कृत" स्थानिक (नेटिव्ह) जनतेकडे सोपविण्यात येत होत्या तरीही जाताना त्यांनी लोकांच्या स्वतःविषयीच्या दृष्टीकोनात, पार त्यांच्या लिंगभावात्मक वास्तविकता व लैंगिकतेच्या कल्पनांपर्यंत, काही मुलभूत बाबी मागे सोडल्या होत्या. साम्राज्यवादी काळात येथील काहीशा स्त्री-लक्षणी व ढोबळ स्वरूपात अस्तित्वात असलेल्या लिंगभावाने अधिक तीव्र पुरुषी स्वरूप धारण केले जे पाश्चात्य संस्कृतीचे द्योतक होते[5]. परिणामतः, लैंगिक व्यवहार व लैंगिकतेविषयी असलेल्या तुलनेने मुक्त व अप्रखर दृष्टीकोनाची जागा नितीमत्ता व विवाह विषयक व्हिक्टोरियन दृष्टीकोनाने घेतली, ज्यावरील देखरेख व नियंत्रण राज्यकर्त्या संस्थेच्या हातात होते.[6] उदाहरणार्थ, प्राचीन व मध्यकालीन भारतात विवाहसंस्थेच्या बाहेरही लैंगिक व्यवहार पुरवत असलेल्या देवळातील नर्तकी, गणिका, परिलिंगभावी व्यक्ती हे सर्व प्रमुख साहित्य, मिथके, आख्यायिका व मौखिक परंपरांमध्ये आढळतात. उत्तर व मध्य भारतात, मोगल राजवटीमध्ये "नौच" - नाचणाऱ्या मुली व "कोठा" या संस्था विकसित झाल्या. दक्षिण भारतमध्ये देवदासी प्रथा होती, ज्यात मुलींना (जैविक लिंगभावी तसेच परीलिंगभावी), ज्या बहुतेकदा दलित समाजातील असत, यल्लम्मा देवीला अर्पण केले जात असे. त्यांना काव्य, संगीत, नर्तन अशा अनेक कला अवगत असत व त्यांना उपजीविकेचे साधन, संरक्षण, सामुदायिक ओळख व सहाय्य ही मिळत असे.[7]

जात व विवाहसंस्थेच्या कठोर मर्यादांपलीकडे जाणाऱ्या लैंगिकतेच्या अशा धूसर संकल्पना साम्राज्यवादी राजवटीस आव्हानात्मक ठरत होत्या, कारण या राजवटीवर एकीकडे सोवळया व्हिक्टोरियन नीतिमत्तेचा प्रभाव होता तर दुसरीकडे, घरापासून दूर राहणाऱ्या त्यांच्या सैनिकांच्या लैंगिक गरजा भागवण्याची सोय करण्याचा प्रश्न होता. ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने त्यांच्या सैन्य व अधिकाऱ्यांकरिता लाल बत्ती क्षेत्रांची (वेश्यागृहांची) स्थापना केली. असे बाह्यगत लैंगिक व्यवहार थांबविणे अशक्य असले तरी साम्राज्याचा समतोल राखण्याच्या दृष्टीने त्यांना किमान नियंत्रित ठेवणे तरी आवश्यक होते. बालहचेट यांच्या युक्तिवादानुसार, "वंश व वर्गाच्या मर्यादा ओलांडणाऱ्या लैंगिक व्यवहारांकडे पाहण्याचा साम्राज्यवाद्यांचा दृष्टीकोन हा सत्तेच्या संरचना व हितसंबंध जपण्याच्या इच्छेतून आकारास आला होता हे स्पष्टपणे जाणवते."[8]

अशा प्रकारे या व्याख्येचे धीमे व अप्रतीक्रमी संक्रमण सुरु झाले. "वेश्याव्यवसाय" हा "अनिष्ट" स्त्रियांचा "हीन" मार्गाने पैसे मिळविण्याचा मार्ग ठरला, ज्यांना राज्यसंस्थेने सुधारण्याची/नियंत्रित करण्याची गरज असते, कारण राज्यसंस्था त्यांना समाजाच्या व नीतिमत्तेच्या स्वास्थ्य व आरोग्याकरिता धोकादायक मानते. आणि अशा प्रकारे "वेश्येची" अभेद्य ओळख निर्माण केली गेल्याने जरी त्यांचे रोजचे आयुष्य त्या साम्राज्यवादी व्याख्येहून निराळे होते, तरीही त्यांतील स्त्रियांना आपल्या व्यवसायाला स्वतःला योग्य वाटेल

---

[5] ए.नंदी, इंटिमेट एनिमी: लॉस अँड रिकव्हरी ऑफ दि सेल्फ अंडर कोलोनायझेशन,ऑक्सफर्ड यु.निव्हर्सिटी प्रेस, ऑक्सफर्ड, १९८८

[6] ए.तांबे, कोड्स ऑफ मिस्कंडक्ट: रेग्युलेटिंग प्रोस्टीट्युशन इन लेट कोलोनिअल बॉम्बे, युनिव्हर्सिटी ऑफ मिनेसोटा प्रेस, मिनियापोलीस, २००९

[7] एल.मूर्ती व एम.शेषु, दि बिझिनेस ऑफ सेक्स, झुबान बुक्स, दिल्ली, २०१३

[8] के.बालहचेट, रेस, सेक्स एंड क्लास अंडर दि राज, विकास पब्लीशिंग हाउस, इंडिया, १९७९

असे नाव देणे अशक्य झाले[9]. अश्विनी तांबे यांनी केलेल्या सविस्तर मानववंशशास्त्रीय संशोधनातून देखील त्या काळातील कायदा प्रक्रिया व त्याद्वारे हा उद्योग रोखण्याच्या व नियंत्रित करण्याच्या निष्फळ प्रयत्नांमुळे अखेर विशिष्ट स्वरूपातील वेश्याव्यवसायास खरे तर खतपाणीच कसे घातले गेले व त्याचवेळी वेश्यांचे दमन होण्याची प्रक्रिया देखील कशी वाढीस लागले याचे वर्णन केले गेले आहे[10].

**स्वातंत्र्योत्तर जागतिक भारत**

लिंगाधारित भेदभावांसह सर्व प्रकारची सामाजिक व आर्थिक असमानता दूर करण्याची संविधानिक उद्दिष्टे प्रतिपादित केली गेली तरीही वंचित समुदाय जी वास्तवता जगत आहेत त्यातून हिंसेच्या अव्याहत वाटेवर असमानतेची व वंचिततेची खोल जाणारी मुळे कलम झालेली दिसतात. हिंसेच्या या मुळांचा मागोवा घेतल्यास त्यांची उपज दोन समांतर व परस्परपूरक अशा घटनांमध्ये आढळून येते: जागतिकीकरणाची व नवउदारीकरणाची प्रक्रिया व राजकारण ज्यामुळे नव्वदच्या दशकापासून राष्ट्रीय अर्थव्यवस्था जागतिक भांडवलाच्या चढउतारांना सामोरी जाऊ लागली, व त्याचबरोबर एका प्रतिगामी, मुलतत्ववादी, बहुमतवादी राष्ट्रवादाची वाढ जो स्थानिक वैविध्यपूर्ण संस्कृतींचे एकजिनसीकरण करून त्यांच्यावर वर्चस्व स्थापन करू पाहत होता, मिश्र समाजाच्या बहुविविधतेचा पोत नष्ट करू पाहत होता पण त्याचबरोबर जातीयवादी उतरंड अधिक बळकट करत होता. सध्याचे भारतीय सरकार निःशंकपणे उजव्या विचारसरणीचे व स्पष्ट हिंदुत्ववादी राष्ट्रवादाचे उद्दिष्ट बाळगत असून, नवउदारीकरणाची धोरणे राबवून अर्थव्यवस्था खुली करणाऱ्या यापूर्वीच्या केंद्रवादी सरकारने मागे ठेवलेला वारसा पुढे नेत आहे.

गेल्या तीन दशकांवर जरी भारताची प्रतिमा एक संभाव्य बलवान जागतिक राज्य म्हणून प्रसिद्ध पावत असली तरीही जागतिक बँकेच्या यादीत ते एक निम्न मध्य उत्पन्न राष्ट्र[11] असून त्याचा गिनी गुणांक आतापर्यंत सर्वाधिक पातळीवर, म्हणजे ०.५० च्या जवळ, पोहोचलेला आहे, जो सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ लुकास चान्सेल व थॉमस पिकेटी यांच्यामते उत्पन्नातील यापूर्वी कधीही नसेल एवढी रुंदावलेली दरी निर्देशित करतो[12].

सर्वात अलीकडच्या अंदाजानुसार भारतातील ७२% लोकसंख्या गावांमध्ये राहते व उर्वरित लोकसंख्या नगरे व शहरांमध्ये राहते[13]. परंतु देशामध्ये झपाट्याने शहरीकरण होत आहे, परिणामी जगातील सर्वाधिक वेगाने वाढ होत असलेल्या १०० शहरांपैकी २५ शहरे भारतातील आहेत. २००७-०८ मध्ये नैशनल सैम्पल सर्व्हे नुसार शहरी भागांमध्ये स्थलांतराचे प्रमाण (एकूण लोकसंख्येमध्ये अंतर्गत व आंतरराष्ट्रीय

[9] पी.लेविन, “ओरिएन्टलिस्ट सोशोलोजी एंड द क्रिएशन ऑफ कोलोनियल सेक्शुॲलिटीज”, फेमिनिस्ट रिव्ह्यू, क्र.६५, २०००, पृ.५ - २१

[10] तांबे

[11] जागतिक बँक, अर्थव्यवस्थांची सूची, मार्च २०१७

[12] ही आकडेवारी जरी साम्भाव्यपणे विवाद्य मानली गेली असली तरी उत्पन्नातील वाढत्या दरीचा प्रश्न खरा आहे असा युक्तिवाद पुढील लेखामध्ये मांडलेला आहे: टी.कुंडू, ‘इज थॉमस पिकेटी राईट अबाउट इनइनइक्वालिटी इन इंडिया?’, लाइव्हमिंट, १५ साप्तेम्बेर २०१७, रिट्रीव्हड २४ ऑक्टोबर २०१७, http://www.livemint.com/Politics/iATqx10XSWaThxs0PBwHRO/Is-Thomas-Piketty-right-about-inequality-in-India.html.

[13] पॉप्युलेशन ऑफ इंडिया,२०१७

स्थलांतरितांची संख्या) ३५% एवढे होते[14]. परंतु, जागतिक भांडवलाच्या तर्कानुसार “वाढ-संवर्धन” करणाऱ्या या शहरीकरण व संरचनात्मक बांधकामाला जोरदार चालना दिली जात असली, आणि भारताचा गेल्या तीन दशकांतील आर्थिक वाढीचा दर जरी अचंबित करणारा असला तरीही देशातील मोठ्या लोकसंख्येला अजूनही अर्थपूर्ण व शाश्वत उपजीविकेचे साधन मिळू शकलेले नाही. विशेषतः ग्रामीण भागात, जेथे धोरणात्मक योजनेने शेती नष्ट करून हाहाःकार माजवला गेला आहे, ज्यामुळे एकीकडे अनियंत्रित अनौपचारिक कामगार, सततची बेकारी, लहान व्यवसायांचे अवमूल्यन निर्माण झाले आहे, तर दुसरीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे.[15]म्हणूनच ग्रामीण भागातून शहरी भागात झालेले स्थलांतर हे बहुतेकदा हतबलतेतून झालेले असते. समान संधी असलेल्या जगात स्वतःची उन्नती साधण्याकरता सर्वंकषपणे विचार करून केलेली ती निवड नसते.

## स्त्रिया, स्थलांतर व जागतिकीकरणाच्या युगातील नवीन असुरक्षितता

स्त्रियांचे स्थलांतर, ज्याचे पारंपारिक कारण विवाहाशी संबंधित असे, त्यांत वाढ होण्याच्या कारणातील प्रमुख घटक आर्थिक असुरक्षितता निर्माण होण्याचा आहे.[16] रोजगाराचा अभाव, त्याबरोबरच सार्वजनिक शिधा वाटप यंत्रणेसारख्या सुरक्षा व्यवस्थेची मोडतोड व शेतीतील सब्सिडींना लावलेली कात्री यामुळे बहुतांश जनता, विशेषतः स्त्रिया, गरिबीच्या व वंचिततेच्या खाईत लोटल्या गेल्या, ज्यामुळे पोट भरण्याकरिता व पर्यायी उपजीविका शोधण्याकरिता त्यांना शहरी भागांमध्ये स्थलांतर करणे भाग पडले. जागतिकीकरणाचे स्त्रियांच्या आयुष्यांवर व रोजगारांवर झालेले विपरीत परिणाम अधोरेखित करणारे अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अहवाल प्रसिद्ध झालेले आहेत, ज्यामध्ये स्त्रियांवर वाढलेली हिंसा, कोलमडलेली आरोग्यव्यवस्था, पुरुषांची पारंपारिक कामे किंवा रोजगार हरपल्यामुळे स्त्री-प्रमुख कुटुंबांमध्ये झालेली वाढ, स्त्रियांना उपलब्ध असलेल्या संसाधनांमध्ये झालेली घट, व स्त्रियांच्या श्रम करण्याच्या वेळात झालेली वाढ, अशा परिणामांचा समावेश आहे.[17]

परंतु, एकीकडे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे स्त्रियांकरिता नवीन प्रकारच्या असुरक्षितता निर्माण झाल्या असल्या तरी दुसरीकडे, स्त्रियांकरिता, विशेषतः अधिक वंचित जाती, दलित व अल्पसंख्यांक स्त्रियांकरिता, नवीन संधींची उपलब्धता, चलनवलनातील वाढ, आर्थिक स्वातंत्र्य व तंत्रज्ञानामुळे मिळालेली स्वायत्तता, या आजतागायत अनुपलब्ध असलेल्या बाबी उपलब्ध झाल्या आहेत. बदल व आव्हानांच्या या गाठबिंदुवर आपल्याला ते गुंतागुंतीचे घटक शोधणे महत्वाचे ठरते ज्यामुळे मानवी तस्करी व स्थलांतर, मानवी तस्करी व लैंगिक काम यांचे अभिसरण होते. कारण असुरक्षितता व “निवडी”चे हेच परस्परांत गुंतलेले घटक जसे स्त्रियांची लैंगिक काम व घरकामासह निरनिराळ्या स्वरूपातील श्रमाधारित कामांमध्ये वाहतूक होण्यास

---

[14] आर.अब्बास व डी.वर्मा, ‘इंटर्नल लेबर मायग्रेशन इन इंडिया रेझेस इंटिग्रेशन चैलेन्जेस फॉर मायग्रंट्स’,मायग्रेशन पॉलिसी इन्स्टिट्यूट, ३ मार्च २०१४, रिट्रीव्हड ९ ऑक्टोबर २०१७, http://www.migrationpolicy.org/article/internal-labor-migration-india-raises-integration-challenges-migrants.

[15] व्ही.सिवा व के.जालीस,’फार्मर्स सुइसाइड्स इन इंडिया, रिसर्च फौंडेशन फॉर सायन्स, टेक्नॉलॉजी एंड इकोलॉजी, एन.डी., http://www.navdanya.org/attachments/Organic_Farming10.pdf

[16] एस.आर.माहोपात्रो, पॅटर्न्स अँड डिटर्मिनंट्स ऑफ फिमेल मायग्रेशन इन इंडिया: इनसाईट्स फ्रॉम सेन्सस, वर्किंग पेपर २४६, इन्स्टिट्यूट फॉर सोशल अँड इकोनॉमिक चेंज,२०१०

[17] ए.जयस्वाल,’ॲन अँथ्रॉपॉलॉजिकल व्हिजन ऑन दि इम्पॅक्ट ऑफ ग्लोबलायझेशन ऑन इंडियन रुरल विमेन: ए क्रिटीकल रियालिटी, आर्टस् सोशल सायन्स, vol 5, issue 2, २०१४

कारणीभूत ठरतात तसेच ते एक उपयुक्त निनाविपणा व सुरक्षित चलनवलनही पुरवतात ज्यायोगे स्त्रिया पोट भरण्याकरिता व आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता लैंगिक कामाचा पर्याय निवडू शकतात.

**भारतातील लैंगिक काम**

भारतातील लैंगिक कामगारांच्या संख्येविषयीचे अंदाज इतके निरनिराळे आहेत की त्यावरून त्यांची गुंतागुंतीची वास्तवता टिपण्याकरिता आवश्यक त्या संवेदनशील व निकोप पद्धतींचा अभाव दिसून येतो. एका संसाधानात "वेश्यांची" संख्या दोन दशलक्ष तर वेश्यागृहांची संख्या २७५००० एवढी नोंदलेली आढळते तर दुसऱ्या एका संसाधानात "व्यावसायिक लैंगिक कामगारांची" संख्या दहा दशलक्ष एवढी आढळते.[18] २००७ मध्ये महिला व बालविकास मंत्रालयाने तीन दशलक्ष पेक्षा अधिक महिला लैंगिक कामगार अस्तित्वात असल्याचा व त्यापैकी ३५.४७ टक्के १८ वर्षाच्या आधीपासूनच या व्यवसायात शिरत असल्याचा अंदाज वर्तवला होता.[19] परंतु प्रत्यक्षात लैंगिक कामाची संख्या, जागा, स्वरूपे किंवा बळजबरीचा वेश्याव्यवसाय किंवा बालकांच्या अवैध तस्करीविषयी देखील कोणतीही सर्वंकष व विश्वासार्ह माहिती उपलब्ध नाही. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थेमधून मिळालेली माहिती त्यातल्या त्यात सर्वात विश्वासार्ह असल्याचे जाणवते, जी त्यांच्या लाक्ष्यिक हस्तक्षेप कार्यक्रमावर आधारलेली आहे, व ज्यात देशातील लैंगिक कामगारांची संख्या एक दशलक्ष हून थोडी अधिक असल्याचे म्हटले आहे.[20] बहुतेक उपलब्ध माहिती ही मर्यादित नमुन्यांमधून बांधलेल्या अंदाजांवर आधारित असून देशातील लैंगिक काम व वेश्याव्यवसायाच्या भव्य पटाला गवसणी घालू शकत नाही.

मुंबई, दिल्ली, बंगलोर सारख्या मोठ्या शहरांमध्ये आढळणाऱ्या वेश्यागृह स्थित वेश्याव्यवसायाव्यतिरिक्त रस्त्यावर किंवा घरातून काम करणाऱ्या लैंगिक कामगार देखील अस्तित्वात आहेत ज्या उदरनिर्वाहाकरिता या धंद्यामध्ये जबरदस्तीने शिरल्या आहेत किंवा त्यात ओढल्या गेल्या आहेत. नवीन तंत्रज्ञानाच्या व इंटरनेटच्या उत्पत्तीमुळे देखील या उद्योगाचे स्वरूप बदलते आहे व अधिक अभिसारित बनते आहे.

लैंगिक काम करणाऱ्या स्त्रियांचे केवळ तेवढेच एक उपजीविकेचे साधन नसते हे नमूद होणे आवश्यक आहे – जे सत्य प्रचलित अभ्यास व संशोधनांमध्ये अनेकदा दुर्लक्षित केले जाते. सेंटर फॉर ॲडव्होकसी ऑन स्टीग्मा अँड मार्जीनलायझेशन (CASAM)-कसम यांनी दोन वर्षांच्या कालावधीमध्ये केलेल्या व २०११ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पहिल्या भारतभरातील पाहणीमध्ये असे आढळून आले की, "आपल्या कामाचे वर्णन करताना अनेक लैंगिक कामगार अगदी सहजपणे लैंगिक काम व अन्य व्यवसाय एका वेळी करीत असल्याचे सांगतात. उदाहरणार्थ, रस्त्यावरील भाजी विक्रेती भाजी विकत असतानाच गिऱ्हाईक शोधते, तर लग्नामध्ये नाच करण्यास जाणारी स्त्री गिऱ्हाईक देखील घेऊ शकते. स्त्रियांचे काम असे निरनिराळ्या कप्प्यांमध्ये बसविता येणार नाही. लैंगिक काम व अन्य कामे अशा प्रकारे परस्परांसोबत गुंतलेली असतात की लैंगिक काम ही एक असाधारण व विलग अशी कृती म्हणून वेगळी करणे आव्हानात्मक ठरते.[21]

---

[18] 'प्रॉस्टिट्युशन इन इंडिया', फॅक्ट्स अँड डिटेल्स, २०१५
http://factsanddetails.com/india/People_and_Life/sub7_3h/entry-4190.html

[19] इंडिया कंट्री रिपोर्ट, महिला व बाल विकास मंत्रालय व संयुक्त राष्ट्रसंघाचे औषधे व गुन्हे कार्यालय.

[20] डी.के.दाश,'६.८ लाख सेक्स वर्कर्स इन इंडिया, दिल्ली रेड लाईट कॅपिटल' टाईम्स ऑफ इंडिया, २१ जुलै २०१०, रिट्रीव्हड १ नोव्हेंबर २०१७, https://timesofindia.indiatimes.com/india/6-8-lakh-sex-workers-in-India-Delhi-red-light-capital/articleshow/6193566.cms.

[21] आर.सहानी व व्ही.के. शंकर, दि फर्स्ट पॅन-इंडिया सर्व्हे ऑफ सेक्स वर्कर्स: अ समरी ऑफ प्रिलिमिनरी फाईन्डींग्स, CASAM,२०११

**मानवी तस्करीचे विवेचन : संदर्भ व संकल्पनात्मक स्पष्टता**

मानवी तस्करीवरदेखील, मग ती भारतात आणण्याकरिता झालेली असो वा भारतातून बाहेर नेण्याकरिता, किंवा देशांतर्गत झालेली असो, कोणतीही अचूक किंवा विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध नाही. बांगलादेश व नेपाळ मधून मध्य पूर्वेकडे लोकांची, काही प्रसंगी लहान मुलांचीही, मानवी तस्करी भारतामार्गे होते हे सिद्ध करण्यास भरपूर पुरावा उपलब्ध आहे. ही वाहतूक अनेक कारणांसाठी, उदाहरणार्थ, कारखान्यातील काम, सर्कसमधील काम, उंटांच्या शर्यती, भीक मागण्याकरिता, घरकाम, दत्तक म्हणून, अवयव काढून घेण्याकरिता, विवाहाकरिता, वेठबिगारीकारिता व लैंगिक कामाकरिता, होत असते. याच देशांमधून भारतामध्ये स्त्रियांची तस्करी देखील, कामाकरिता, लग्नाकरिता किंवा लैंगिक कामाकरिता, बळजबरीने,फसवून किंवा मर्जीने केली जाते[22]. अंतर्गत तस्करी देखील होत असते, जेंव्हा तस्करी करणारे स्त्रियांना कपड्यांच्या कारखान्यात नोकरी देण्याचे आमिष दाखवून आणतात व नंतर त्यांचा पगार किंवा कागदपत्रे अडवून ठेवून त्यांना अडकवून ठेवतात. मानवी तस्करीची अनेक स्वरूपे असली तरीही मानवी तस्करी विरोधी प्रयत्न हे बहुतांशी लैंगिक काम व लैंगिक कामगारांवरच केंद्रित असल्याचे जाणवतात.

कपूर यांच्यामते, 'ढकलणे व ओढणे यामुळे असुरक्षित झालेली हालचाल, जेथे वाहतूक होते अशा निरनिराळया जागा व स्थलांतराचा व्यापक प्रश्न, या सर्व बाबी भारतातील मानवी तस्करीच्या प्रश्नावर होत असलेल्या चर्चेतून हाताळल्याच जात नाहीत. अशा प्रकारच्या संकुचित चर्चेमुळे, कायदेशीर व धोरणात्मक प्रतिसाद हा केवळ लैंगिक काम नियंत्रित करणे, सीमा नियंत्रण अधिक काटेकोर करणे, व वेश्यागृह चालक किंवा लैंगिक कामाच्या उद्योगातून फायदा मिळवणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करणे एवढ्यापुरताच मर्यादित राहतो[23].

**मानवी तस्करी व लैंगिक कामाचे कायदेशीर संदर्भ**

कायदा, धोरणे, व्यवहार व सार्वजनिक समज या सर्वांमध्ये लैंगिक काम व मानवी वाहतूक याचे एकत्रीकरण झालेले आढळते. मानवी तस्करी व लैंगिक काम या दोन्हीकरिता सध्या अस्तित्वात असलेला प्रमुख कायदा म्हणजे अनैतिक मानवी तस्करी (प्रतिबंध) कायदा १९८६ (Immoral Traffic (Prevention) Act of 1986) (ITPA). हा कायदा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या स्त्रिया व मुलींच्या अनैतिक तस्करीचे दमन कायदा १९५६ (Suppression of Immoral Traffic in Women and Girls Act of 1956)(SITA) याची सुधारित आवृत्ती आहे. ही लक्षणीय बाब आहे की SITA पारित होण्याची प्रक्रिया ही देशांतर्गत झालेल्या कोणत्याही लोकचळवळीतून घडलेली नसून, भारताने १९४९संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी तस्करी, शोषण, वेश्याव्यवसाय यांचे दमन करणारा जाहीरनामा या दस्तावेजावर सही केल्यामुळे घडली.

SITA व ITPA मध्ये वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रीला गुन्हेगार मानले जात नाही, कारण तिला बळी समजले जाते, पण जे यातून नफा कमावतात किंवा या स्त्रियांचे शोषण करतात त्यांना गुन्हेगार मानले जाते. याशिवाय भारतीय संविधानाच्या कलम २३ नुसार मानवी वाहतुकीस बंदी घातलेली आहे. तसेच भारताने अनेक आंतरराष्ट्रीय जाहिरनाम्यांवर सही केलेली आहे, उदा. बाल हक्कांचा जाहीरनामा (१९८९), महिलांवर होणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावाचे उच्चाटन करणारा जाहीरनामा (१९७९), संयुक्त राष्ट्रसंघाचा

---

[22] आर.कपूर, 'इंडिया', इन GAATW, कोलॅटरल डॅमेज: दि इम्पॅक्ट ऑफ अँटीट्रॅफिकिंग इनिशिएटिव्हज ऑन ह्युमन राईट्स अराउंड दि वर्ल्ड, GAATW, बँकॉक, २००७

[23] ibid

मानवी तस्करीस, विशेषतः महिला व मुलांच्या, प्रतिबंध, दमन व शासन करणारा करार (२०००), आणि अगदी अलीकडचा दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघाचा (SAARC) महिला व मुलांच्या वेश्याव्यवसायाकरिता होणाऱ्या मानवी तस्करीचा प्रतिबंध व विरोध करणारा जाहीरनामा(२००२). या कायद्यांव्यतिरिक्त मानवी तस्करीच्या कायदेशीर चौकटीत बाल न्याय(बालकांची काळजी व सुरक्षा) कायदा २०००, व बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा २०१२ (POCSO) यांचाही समावेश आहे.

इटपा (IPTA) अंतर्गत, वेश्याव्यवासायाशी संबंधित खालील बाबींना गुन्हा मानले गेले आहे : वेश्यागृह चालविणे (कलम ३), वेश्येच्या उत्पन्नावर जगणे (कलम ४), वेश्याव्यवसायाकरिता एखादी स्त्री मिळविणे किंवा तिला अडकवून ठेवणे (कलम ५ व ६), वेश्याव्यवसाय करण्याच्या उद्देशाने पाठपुरावा करणे (कलम ८), सार्वजनिक ठिकाणांच्या आसपास वेश्याव्यवसाय चालविणे (कलम ७).[24] याशिवाय या कायद्यामध्ये सुधारगृहांच्या स्थापनेची तरतूद आहे जिथे महिला गुन्हेगारांना ठेवून “सुधारले” जाईल व या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता विशेष पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचेही या कायद्यात सूचित केलेले आहे[25]. इटपा (IPTA) व्यतिरिक्त भारतीय दंडविधानातील कलमे, राज्य व नगरपालिका पातळीवरील कायद्यांचा देखील स्थानिक कायदा अंमलबजावणीदारांकडून वापर केला जातो, याचे कारण कदाचित हे असू शकेल की या कायद्यांखालील गुन्हे निकालात काढणे हे इटपा (IPTA) अंतर्गतच्या गुन्ह्यांपेक्षा कमी जाचक ठरते, कारण IPTAमध्ये न्यायालयीन चौकशी ची प्रक्रिया अपेक्षित असते. म्हणजेच, ‘सार्वजनिक विनयशीलता, नितीमत्ता, उपद्रव, रेंगाळणे, उनाडपणा यांच्याशी संबंधित किंवा निर्बंधित क्षेत्र व आरोग्यविषयक नियम यांच्याशी संबंधित संदिग्ध शब्दात लिहिलेल्या कायद्यांच्या अखत्यारीत, लैंगिक कामास गुन्हा ठरविण्यात येते.

परिणामी, भारतभरात सर्वत्र, लैंगिक कामगारांना नियमितपणे अटक केली जाते, व्यवसायाकरिता मागणी करत नसतानाही. एचआयव्ही/एड्स वर काम करणारे कार्यकर्ते व पिअर एजुकेटर्सना कोन्डोम वाटप करतांना किंवा लैंगिक कामगारांना एचआयव्ही/एड्स प्रतिबंधाची माहिती देत असतानाही पोलीस त्रास देतात.[26]

**सद्यस्थितीत कायद्यासामोरील आव्हाने**

जागतिक पातळीवरून भारतावर आपले मानवी तस्करीशी निगडीत कायदे व धोरणे बदलण्याकरिता दबाव आणला जात आहे, ज्यास अमेरिकेचा वार्षिक व्यक्तींची तस्करी अहवाल (Trafficking in Persons Report) (TIP Report) कारणीभूत आहे.

भारतामध्ये वेश्याव्यवसायाचे गुन्हेगारीकरण करणारा कोणताही कायदा नसल्याने, दंडयोजनेच्या दबावामुळे भारत सरकारने अनैतिक मानवी तस्करी (प्रतिबंध) कायदा सुधारणा मसुदा, २००६ चा आराखडा तयार केला ज्यात अन्य क्षेत्रात होणारी मानवी तस्करी पूर्णपणे नजरेआड करून, लैंगिक

---

[24] SANGRAM: सेक्स वर्क अँड लॉज इन साउथ एशिया: अ मोनोग्राफ, SANGRAM, २०१०, येथे उपलब्ध https://www.sangram.org/resources/sex_work_and_laws_in_south_asia.pdf.

[25] पी.कोटीस्वरण,’प्रीपेअरिंग फॉर सिव्हील डीसोबिडीयंस: इंडिअन सेक्स वर्कर्स अँड दि लॉ, थर्ड वर्ल्ड लॉ जर्नल, व्होल.२१, इश्यू २, २००१, पृ. १६१-२४२

[26] साधना महिला संघ, व्हायोलेंस अगेन्स्ट पीपल इन सेक्स वर्क इन इंडिया: सबमिशन टू दि स्पेशल राप्पोरटियर ऑन व्हायोलेंस अगेन्स्ट विमेन, एनडी, रिट्रीव्हड ६ ऑगस्ट २०१७

कामगारांच्या गिऱ्हाईकांना गुन्हेगार ठरविण्यात आले आहे व श्रमाधारित कामांकरिता मानवी तस्करी वापरणाऱ्या कंपन्या व मालक यांना पूर्णपणे वगळण्यात आले आहे.

सुधारित मसुद्याच्या आराखड्याला प्रतिसाद देताना लैंगिक कामगारांच्या संघटनांनी याकरिता नेमलेल्या संविधानिक समितीसमोर व हे प्रस्ताव पाठवले जाणाऱ्या आरोग्य मंत्रालयासमोर आपले म्हणणे लावून धरले व असे मांडले की गिऱ्हाईकांना गुन्हेगार केल्यास लैंगिक कामाचा उद्योग भूमिगत होईल व लैंगिक कामगारांना अधिक जोखमींना तोंड द्यावे लागेल, विशेषतः एचआयव्ही/एड्स च्या. आरोग्य मंत्रालयाने एका अभूतपूर्व निर्णयाद्वारे गिऱ्हाईकांना गुन्हेगार ठरवणाऱ्या या सुधारणा अमान्य करण्याची शिफारस केली व अखेर हा आराखडा संसदेमध्ये तग धरू शकला नाही.[27]

परंतु २०१३ मध्ये पारित केल्या गेलेल्या फौजदारी कायदे सुधारणा कायद्याद्वारे महिला व मुलांची मानवी वाहतूक होण्यापासून संरक्षण करण्याकरिता भारतीय दंडविधानाच्या कलम ३७० मध्ये सुधारणा केली गेली तेव्हा हा धोका पुन्हा एकदा नव्याने डोके वर काढू लागला. जरी जस्टीस वर्मा समितीने, ज्यांच्या अहवालाचा समावेश या कायदा सुधारणेमध्ये केला गेला होता, लैंगिक कामगारांच्या संघटनांना आश्वासित केले की सज्ञान लैंगिक कामगार याच्या आवाक्यामध्ये येणार नाहीत तरीही प्रत्यक्षात मात्र याचा वापर "लैंगिक कामात असलेल्या सज्ञान व्यक्ती" व "मानवी तस्करी झालेल्या व्यक्ती" यामध्ये कोणताही फरक न करता, सज्ञान लैंगिक कामगारांच्या गिऱ्हाईकांना अटक करण्याकरिता केला जात आहे. उलटपक्षी, २०१६ मध्ये आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने स्वाधिकारात दखल घेऊन पोलिसांना भारतीय दंडविधानाच्या कलम ३७० अंतर्गत लैंगिक कामगारांच्या गिऱ्हाईकांविरोधी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते[28].

मे २०१६ मध्ये महिला व बाल विकास मंत्रालयाने, व्यक्तींची तस्करी (प्रतिबंध, संरक्षण व पुनर्वसन) असा मसुदा आराखडा निर्माण केला जो देशातील पहिला असा मानवी तस्करी विरोधी कायदा मानला गेला ज्याची प्रमुख उद्दिष्टे अस्तित्वात असलेल्या कायद्यांचे एकत्रीकरण, अन्य क्षेत्रांना समाविष्ट करण्याकरिता व्याख्येचा परीघ रुंदावणे व सुटका केलेल्या व्यक्तींना पुनर्वसन हा हक्क प्राप्त होणे अशी होती. जरी पोलिसांची हिंसा, लक्षणीय लैंगिक आरोग्य जोखमी, लैंगिक हल्ले, आर्थिक असुरक्षितता व लैंगिक कामगारांसमोर असलेल्या अन्य समस्या दूर करण्याची ही एक अभूतपूर्व संधी होती तरीही लैंगिक कामगारांच्या संघटनांनी या मसुदा आराखड्याला विरोध केला कारण, एक म्हणजे यात मानवी वाहतुकीची पुरेशी स्पष्ट व्याख्या केली गेली नव्हती, व मसुदा तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये लैंगिक कामगारांना समाविष्ट करून घेतले नव्हते.[29]

---

[27] पी.कोटीस्वरण,बियॉन्ड दि अल्युर्स ऑफ क्रीमिनालायझेशन: रिथिंकिंग थे रेग्युलेशन ऑफ सेक्स वर्क इन इंडिया, क्रीमिनोलोजी एंड क्रिमिनल जस्टीस, व्होल.१४, इश्यू ५, २०१४, पृ. ५६५-५७९

[28] आरती पै, CASAM यांच्याशी मुलाखत

[29] पहा, उदा.पी.कोटीस्वरण, 'इंडियाज न्यू अँटी-ट्रॅफिकिंग बिल इज ॲन एम्प्टी जेश्चर', दि वायर, ५ जुलै २०१६, https://thewire.in/48494/indias-new-anti-trafficking-bill-is-an-empty-gesture/; S.Data, ' व्हाय सेक्स वर्कर्स आर ओप्पोझिंग मोदी गव्हर्नमेंट्स अँटी-ट्रॅफिकिंग लॉ 'कॅच न्यूज, २ जुलै २०१६, http://www.catchnews.com/india-news/why-sex-workers-are-opposing-modi-govt-s-anti-trafficking-law-1467444055.html

## संशोधनपद्धती

या संशोधानामागील तर्कमिमांसा व त्यातील घटक व्हॅम्प संघटन, मित्रा व संग्राम च्या प्रतिनिधींसमोर मांडून त्यावर चर्चा केली गेली व मगच केंद्रीक गटचर्चा, मुलाखती व क्षेत्रभेटी विषयी ठरविण्यात आले. त्यानुसार संशोधनाचा भाग म्हणून समुदायासोबत खालील बाबींचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात आली.

अ. मुलाखती, व्हिडीओ मुद्रण व प्रकाशित साहित्य वापरून, मानवी वाहतुकीच्या तीन घटना व समूहाने त्यातून उद्भवलेले प्रश्न कशा प्रकारे हाताळले याची नोंद करणे :
   a. नेपाळहून तस्करी झालेली एक स्त्री जिला व्हॅम्प ने तिच्या कुटुंबाकडे परत पाठवली
   b. बांगलादेशहून तस्करी झालेलेई एक स्त्री
   c. राजस्थानहून तस्करी झालेली एक अल्पवयीन मुलगी

आ. व्हॅम्प ने वेश्याव्यवसाय विरोधी निष्ठेची शपथ घेण्याचे नाकारल्याने USAID यु .एस .ए .आई डी ला अनुदान परत करावे लागल्याबद्दल व त्याचा परिणाम म्हणून २००५ मध्ये केले गेलेले “धाडी व सुटके”चे सत्र याविषयीच्या नोंदी करणे

इ. गोकुळनगर व मिरज च्या समुद्यांशी अनुक्रमे धाडी व तंटा मुक्ती समिती याविषयी केंद्रीक गटचर्चा. यातील पहिल्यामध्ये १५ स्त्री-पुरुष, व्हॅम्प व मित्रा चे प्रतिनिधी यांनी सहभाग घेतला. तर दुसऱ्यामध्ये व्हॅम्प मधील अंदाजे १० महिलांनी. तंटा मुक्ती समित्या या समुदायातील हिंसा व भेदभावाचे प्रश्न तसेच स्त्रिया व मुलांच्या लैंगिक कामाकरिता होणाऱ्या तस्करी चे प्रश्न हाताळणाऱ्या समुदायांतर्गत असलेल्या समित्या असतात.

ई. त्यांना जाणवल्यानुसार मानवी तस्करी चे व समुदायांतर्गत किंवा समुदायाविरोधी झालेल्या हिंसांचे प्रश्न सोडविताना त्यांनी ज्या संस्था किंवा व्यक्तींशी संपर्क साधला त्यांच्याशी भेटी. यामध्ये पोलीस डेप्युटी सुपेरींटंडेंट, जिल्हा कायदेशीर सेवा कार्यालयातील प्रतिनिधी, व एक वरिष्ठ वकील ज्यांनी त्यांना त्यांच्यावर घातलेल्या मानवी तस्करी च्या खोट्या केसेसमध्ये मदत केली, यांचा समावेश होता.

उ. कर्नाटक – महाराष्ट्र यांच्या सीमेवर असलेल्या महालिंगपुरा नावाच्या शेजारी जिल्ह्याला भेट, जो देवदासी पट्ट्याचा भाग आहे.

ऊ. निरनिराळ्या समुदायातील लैंगिक कामगारांच्या मुलाखती, मित्राच्या प्रतिनिधी व संग्राम च्या प्रतिनिधी म्हणून मीना शेषु व आरती पै यांच्या मुलाखती. आम्ही एकूण ८ लैंगिक कामगार, २ लैंगिक कामगारांची मुले व २ संस्थांचे प्रतिनिधी यांच्या मुलाखती घेतल्या.

केंद्रीक गटचर्चा व मुलाखती, कानडी, इंग्रजी, हिंदी व काही ठिकाणी मराठीतून घेतल्या गेल्या. लेखी टिपणे करण्याव्यतिरिक्त आम्ही या मुलाखती व चर्चा ध्वनिमुद्रित देखील केल्या व नंतर त्यांचे प्रतीलेखन केले.

चर्चेला जरी एक ढोबळ चौकट असली तरी ती खुली ठेवल्याने आम्हाला अधिक उत्स्फूर्त व मुक्त वाहणारे प्रतिसाद मिळवता आले.

## मर्यादा

व्हॅम्प जरी वेश्यागृहातील स्त्रिया, रस्त्यावरून, घरून लैंगिक काम करणाऱ्या स्त्रिया तसेच लैंगिक काम करणाऱ्या गृहिणी या सर्वांसोबत काम करीत असली तरी या संशोधनाची एक मुलभूत मर्यादा ही आहे की त्यात फक्त वेश्यागृहाद्वारे काम करणाऱ्या स्वसंघटीत संघटनांतील लैंगिक कामगारांचा समावेश आहे ज्या सांगली/मिरज या महाराष्ट्रातील विशिष्ट इतिहास व संस्कृती असलेल्या जिल्ह्यांमध्ये स्थित आहेत. यात

लैंगिक कामगारांचे प्रतिनिधित्व करणारा नमुना निवडण्याचे उद्दिष्ट नव्हते तर या विशिष्ट संदर्भात संघटीत झालेल्यांवर लक्ष केंद्रित करण्याचे उद्दिष्ट होते त्यामुळे रस्त्यावरील सर्व अनौपचारिक लैंगिक कामगार किंवा मुंबई, कलकत्ता यासारख्या मोठ्या शहरांतील वेश्यागृहातील लैंगिक कामगारांची परिस्थिती जाणून घेण्याकरिता यातील निष्कर्षांचे विस्तारीकरण करता येणार नाही. परंतु त्यांच्या लढ्यातून व रणनीती मधून धडे नक्कीच घेता येतील.

## निष्कर्ष

### संग्राम/ व्हॅम्प ची पार्श्वभूमी

या अभ्यासाच्या केंद्रस्थानी लैंगिक काम व वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांची संघटना असलेली वेश्या अन्याय मुक्ती परिषद - व्हॅम्प (VAMP)[30], व तिची उद्गाती स्वयंसेवी संस्था, संपदा ग्रामीण महिला संस्था, (संग्राम) होत्या.

या अभ्यासाच्या केंद्रस्थानी जुन्या लाल बत्ती भागांमध्ये काम करणारी समुदाय-स्थित संस्था असल्याने, सांगली व मिरज या दक्षिण महाराष्ट्रातील प्रामुख्याने शेतीप्रधान समाजामध्ये वसलेल्या, बऱ्यापैकी साधन जुळया शहरांना असलेला लैंगिक काम व मानवी तस्करी चा संदर्भ, थोडक्यात का होईना, समजून घेणे आवश्यक ठरते. ही शहरे जिल्ह्यातील बाजारसमित्यांची केंद्रे असल्याने खेडेगावांमधील शेतकरी आपला शेतीमाल येथे विकावयास आणत असत. मालाची विक्री करून हातात वरकड पैसा आलेल्या शेतकऱ्यांची चैनीची गरज पुरविण्याच्या उद्दिष्टाने या शहरांमध्ये हॉटेल्स, बार व लाल बत्ती वस्त्या फोफावल्या. शेतकरी आपल्या “ठेवलेल्या बायका” देखील येथे आणत, त्यांना मिरजेतील एका लहानशा जागेत ठेवत व नंतर त्यांना सोडून देत. जवळील पैसे संपले की या स्त्रिया देखील लाल बत्ती वस्तीमध्ये सामावल्या जात असत. तरुण वयात आलेल्या मुली वय वाढल्यावर “घरवाल्या”[31] बनत व गावी परत जाऊन आणखी तरुण मुली घेऊन येत.

महत्वाचे रेल्वे जंक्शन असल्याने, कर्नाटकातून मुंबईकडे पळून जाणाऱ्या मुलींचे व देवदासींचेदेखील, मिरज हे आगमन व मुक्कामाचे स्थान होऊ लागले, ज्यांना या मार्गाने “परमोच्च शहरात” पोहोचायचे होते.

आता राजस्थान, पश्चिम बंगाल व ईशान्य भारतातील विविध राज्यांमधून तसेच बांगलादेश व नेपाळ या देशांमधून मोठ्या संख्येने अनेक मुली/स्त्रिया मिरजेला, व काही प्रमाणात सांगलीला, स्थलांतर करतात. येथील समुदायांमध्ये असलेल्या व्हॅम्प च्या उपस्थितीमुले या शहरांना कामाकरता “सुरक्षित” क्षेत्र असल्याची ओळख प्राप्त झाली आहे.[32]

### संग्राम

नव्वदच्या शतकातील एचआयव्ही/एड्सच्या जगद्व्यापी साथीमध्ये लैंगिक काम करणाऱ्या स्त्रियांना लाक्ष्यिक हस्तक्षेपाकरिता अति जोखमीचा गट ठरवले जाण्याच्या पार्श्वभूमीवर संग्रामने १९९२ पासून लैंगिक कामात असलेल्या स्त्रियांबरोबर कामास सुरुवात केली. मुंबईनंतर महाराष्ट्रात एचआयव्ही/एड्सचा सर्वाधिक प्रादुर्भाव असलेल्या सांगली जिल्ह्यात स्थित असलेल्या संग्रामच्या कामाचे कार्यक्षेत्र आता दक्षिण महाराष्ट्र व कर्नाटकच्या जिल्ह्यांतील ग्रामीण व मुस्लीम महिला तसेच लैंगिक अल्पसंख्यांकांसह विविध समुदायांपर्यंत पोहोचले आहे. प्रतिकूल व कडव्या स्पर्धेच्या वातावरणात लैंगिक काम करणाऱ्या स्त्रियांमध्ये संघटीत आत्मभान आणण्याकरिता समुदाय-स्थित संस्थात्मक संरचना निर्माण करण्यावर संग्रामने लक्ष केंद्रित केले. एकीकडे बाहेरील जगाकडून होणारा अत्याचार, कलंकित दृष्टीकोन व वंचिततेची वागणूक, तर दुसरीकडे स्वतःच्याच समुदायांतर्गत गिऱ्हाईके, आश्रयदाते, संसाधने मिळविण्याकरिता असलेली तीव्र स्पर्धा, हिंसा व शोषण, या सर्वांनी ग्रस्त असलेल्या वातावरणात काम सुरु करणे सोपे नव्हतेच. १९९२

---

[30] वेश्या अन्याय मुक्ती परिषद या नावाच्या अद्याक्षारांपासून बनलेले VAMP हे नाव वापरल्याने ती संज्ञा आपल्या कक्षेत आणून तिच्या अर्थाला आव्हान दिले गेले आहे.

[31] वेश्यागृह चालवणाऱ्या स्त्रिया

[32] मीना शेषुशी चर्चा

साली गोकुळनगर येथील वेश्यागृहातील १६ लैंगिक कामगार वेश्यागृहाच्या काही मालकिणीकडून मिळालेल्या अबोल पाठींब्यानंतर संग्रामच्या एचआयव्ही/एड्स प्रतिबंधात्मक कामात समशील कार्यकर्त्या म्हणून औपचारिकपणे काम करू लागल्या, ज्यामुळे महाराष्ट्रातील स्त्री-केंद्रित, प्रक्रीयाधारित व सक्षमतेवर भर असलेली, लैंगिक कामगारांची चळवळ उभी राहण्यास चालना मिळाली. १९९५ मध्ये संघटनेची व्हॅम्प VAMP[33] म्हणून स्वतंत्र नोंदणी करण्यात आली.

**व्हॅम्प**

सुरुवातीला असलेले "वेश्या एड्स मुकाबला परिषद" हे नाव १९९८ साली बदलून 'वेश्या अन्याय मुक्ती परिषद' असे ठेवण्यात आले. त्यांच्या उत्पत्तीच्या त्यांनीच केलेल्या विश्लेषणात म्हटल्याप्रमाणे '"एड्स मुकाबला" पासून "अन्याय मुक्ती" पर्यंत झालेले हे संक्रमण, एड्सविरोधी लढयापासून सुरु झालेल्या परंतु आता अन्याय व दमनापासून मुक्ती मिळण्याकरिता संघर्ष करणाऱ्या एका विस्तृत चळवळीपर्यंत पोहोचलेल्या आमच्या सामुदायिक प्रवासातील एक महत्वाचा टप्पा आहे."[34]

संस्थांतर्गत व संस्था-संस्थांमधील सत्ताधरीत संबंधांची दखल घेऊन, त्यांना नजरेआड न करता, एक पूर्णतः विकेंद्रित, पसरट व सहभागी पद्धतीची निर्णयप्रक्रिया निर्माण करण्यात आली आहे ज्यामुळे प्रस्थापित सत्ता उतरंडीस सतत आव्हान दिले जाते व सांघिक प्रक्रिया शाश्वत ठेवली जाते. व्हॅम्प ला ५००० हून अधिक लैंगिक कामगारांचे सभासदत्व लाभले आहे. ढोबळपणे संघटना म्हणून काम करत असताना, सभासदत्व अनेकदा औपचारिक नसून गरजेवर आधारित असते. व्हॅम्प काम करत असलेल्या कोणत्याही ठिकाणच्या लैंगिक कामगारास सेवा घेण्याचा अधिकार आहे, त्या साप्ताहिक मोहल्ला समिती बैठकींना उपस्थित राहू शकतात, तक्रार नोंदवू शकतात किंवा समुदायात उद्भवणाऱ्या संघर्षांमध्ये मध्यस्थी करू शकतात. अन्य हस्तक्षेपांमध्ये पोलिसांकडे वकिली करणे, सहकामगारांना सरकारी आरोग्य सेवा घेण्यास मदत करणे व सभासदांमधील नेतृत्वगुणांना चालना देणे यांचा समावेश आहे.

संग्रामने निर्माण केलेल्या अन्य संघटनांबरोबर, एचआयव्ही पोझिटिव्ह लैंगिक कामगार (VAMP plus), पुरुष व ट्रान्स जेन्डर लैंगिक कामगार (मुस्कान), लैंगिक कामगारांची मुले (मित्रा), ग्रामीण महिला (विद्रोही महिला मंच) व मुस्लीम महिला (नजरीया), देखील एकत्र काम करते.

---

[33] 'संग्राम/व्हँप टीम, 'दि संग्राम/व्हँप सेक्स वर्कर्स मुव्हमेंट इन इंडियाज साउथवेस्ट', इन एस.बाटलीवाला(संपादित) चेंजिंग दि वर्ल्ड, २री आवृत्ती, एडब्ल्यूआयडी,टोरोंटो, मेक्सिको सिटी, केप टाऊन,२०११

[34] ibid

**क्षेत्रातील टिपणे**

मीनाने ग्रामीण महाराष्ट्रातील महिला चळवळीसोबत काम सुरु केले तेव्हापासून आतापर्यंत संग्राम व व्हॅम्प ने खूप अंतर मागे टाकले आहे हे स्पष्टपणे आढळते. जिला सामाजिक मान्यता होती व विवाह व कुटुंब संस्थेत जी "बळी" ठरवली गेली व जिला सक्षम करून हक्क मिळवून द्यायचे होते, अशा "चांगली स्त्री" अर्थात "पत्नी" सोबतच्या कामापासून, याच संस्थांना धोकादायक मानल्या गेलेल्या "वाईट स्त्री" सोबत काम करण्यापर्यंत, असा केंद्रभूत बदल संघटनेच्या कामामध्ये झालेला दिसतो.जरी स्त्री चळवळीतील कामाच्या सुरुवातीपासूनच संग्रामने संघटीततेची राजकीय चौकट अंगिकारली होती तरी, आजतागायत वंचित व अदृश्य असलेल्या लैंगिक कामगारांच्या समुदायांमध्ये, व्हॅम्प द्वारे, त्याची पाळेमुळे घट्ट रोवली गेली व त्याला खतपाणी घातले गेले. यामुळे एक व्यस्त राजकीय प्रथा उदयास आली ज्यामध्ये "बळी" हीच स्वतःची तारणहार होती, संघटना ही तिची राजकीय ओळख होती व समुदाय हा तिच्या सबलीकरणाचा स्त्रोत होता. आणि हे घडू शकळे कारण त्यांच्या वाढीच्या गाभ्याशी काही विशिष्ट मुल्ये जपली होती, जी मीनाच्याच शब्दात : समुदाय आम्हला मार्ग दाखवितो. काय बरोबर व काय चूक हे आम्ही समुदायालाच ठरवायला सांगतो. ते स्वतःला बळी किंवा हतबल समजत नाहीत हे आमच्या लक्षात आले आणि मग त्यांच्या आयुष्यात ते ज्या कृतीशील क्षमता वापरतात त्यामधून आम्ही शिकू लागलो.

**संघटीत होण्याचे फायदे**

आम्ही ज्या वयस्क पिढीतील महिलांना भेटलो, ज्यांना आपल्या भूतकाळाविषयी ठळक आठवणी आहेत, त्या सर्वांनीच त्या कशा बंदिस्त ठिकाणांमध्ये समाजाने वाळीत टाकल्याप्रमाणे राहत असत याविषयी सांगितले. त्यांना गुन्हेगार मानणाऱ्या पोलिसांकडून, गुंडांकडून, हिंसक गिऱ्हाईकांकडून, दलालांकडून होणारी हिंसा व अत्याचार तसेच वेश्यागृहे चालविणाऱ्या घरवाल्यांकडून त्यांच्या मनाला येईल तसा छळ, या दोन्हींना सामोरे जात असताना, त्यांच्या आयुष्याला आच्छादून टाकणाऱ्या कलंकाच्या कफनाने त्यांचे आवाज घोटून टाकले होते. म्हणूनच संघटीत होण्याचे फायदे, विशेषतः एचआयव्ही/एड्स च्या संकटाच्या संदर्भात, काळाच्या ओघात अनेक पातळ्यांवर उघड झाले आहेत.

**एचआयव्ही/एड्स च्या संकटाचा सामना करताना एकांतवासाचा बिमोड**

एचआयव्ही/एड्सची समस्या ही त्यांच्या संघटीत होण्याच्या केंद्रस्थानी होती. सुरुवातीला बाहेरून येणाऱ्या कोणाबद्दलही समुदायाच्या मनात अविश्वास असायचा व त्यांना सवयीच्या झालेल्या नितीमत्ता-आधारित हस्ताक्षेपांविषयी साशंकता असायची.

त्यामुळे मीनाने प्रथम जेव्हा सांगली व मिरजेच्या समुदायांना भेटी देण्यास सुरुवार केली तेव्हा स्त्रिया अक्षरशः तिच्यापासून दूर पळायच्या.

*मिरजेच्या सिव्हील (सरकारी) रुग्णालयात एक गरोदर महिला दाखल झाली व ती एचआयव्ही पोझिटिव्ह असल्याचे निदान केले गेले. सर्वांना असे वाटू लागले की एचआयव्ही धंद्यामुळे पसरतो. तेंव्हाच मीनामॅडम आमच्या वस्तीत येत होत्या. पहिल्यांदा त्या आल्या तेव्हा आम्हा सर्वांना वाटले की त्या पोलिसच आहेत व आम्ही सर्व घाबरून पळून गेलो! त्या चहाची एक मोठी किटली घेऊन आल्या जो आम्ही कोणीच प्यायलो नाही. पण तरीही त्या येतच राहिल्या. हळूहळू त्या का येतात हे आम्ही ऐकून घेऊ लागलो व त्या आम्हाला निरोध वापरून आम्ही स्वतःचे संरक्षण कसे करू शकतो ते शिकवू लागल्या. हळूहळू आमच्या बैठकी अधिक नियमित होत गेल्या व इतर वस्त्यांमध्येदेखील आम्ही मैत्रिणी निर्माण केल्या आणि या प्रश्नांबद्दल बोलण्याकरिता आम्ही लहान लहान गट तयार केले.*

**केंद्रित गटचर्चा, प्रेमनगर, मिरज**

सिव्हील हॉस्पिटल व पोलीस या दोन्हींकडून मिळणाऱ्या भेदभावात्मक वागणुकीच्या पार्श्वभूमीवर, सुरुवातीच्या काळातील प्रमुख संघर्ष हे (चांगल्या दर्जाचे निरोध उपलब्ध होण्यासह) दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याकरिता व पोलिसांच्या अमानुषतेपासून संरक्षण मिळण्याकरिता होते. स्त्रियांना शासन व बाह्य समाजाशी थेट संपर्क उपलब्ध करून देण्याच्या या पद्धतीमुळे, एकांतवास व कळपाने जगण्याची पद्धत मोडून काढण्यात, लैंगिक कामाशी जोडलेल्या सामाजिक कलंकाला आव्हान देण्यात, व त्यांची एचआयव्ही पसरवणारे घटक म्हणून नव्हे तर सीमेवर उभे ठाकून त्याचा सामना करणारे सैनिक म्हणून ओळख निर्माण करण्यात, मुलभूत मदत झाली.

**हिंसेचा सामना व कामाची व्याख्या करण्याकरिता संघटीकरण**

१९९६/९७ पर्यंत जेव्हा समुदायाचे आरोग्य सुधारू लागले तेव्हा हळूहळू कामाचे लक्ष्य या स्त्रियांच्या आयुष्यातील हिंसेच्या प्रश्नावर केंद्रित होऊ लागली जी मुख्यतः, समुदायाबाहेरून पोलिसांद्वारे तर समुदायांतर्गत गुंडांकडून केली जायची. जेव्हा व्हॅम्प ने पोलिसांच्या अत्याचार व अमानुषतेच्या मोठ्या घटना हाती घेऊन त्यांचा संदर्भ अधिक व्यापक अशा लैंगिक कामगारांच्या मानवी हक्कांशी जोडण्याकरिता जोरदार मोहीमा चालविल्या व समर्थन केले तेंव्हा संघटनात्मक कार्य एका वेगळ्याच पातळीवर पोहोचले[35].

त्यांनी अंतर्गत हिंसेची प्रकरणेदेखील हाताळण्यास सुरुवात केली, ज्यात शोषण करणाऱ्या वेश्यागृह मालकिणी, गुंड, हिंसक गिऱ्हाईक व राजकीय नेते यांचा समावेश होता, आणि आज या सर्व घटकांना संघटनेशी वाटाघाटी करणे भाग पडते आहे. त्यांच्या हस्तक्षेपामुळे लैंगिक कामगार लैंगिक कामातील हिंसा दूर करण्यामध्ये कळीची भूमिका निभावू शकतात याची दखल अखेर पोलिसांनाही घ्यावी लागली.

*जर घरवालीने लैंगिक कामगारांस योग्य तो मोबदला दिला नाही तर मोहोल्ला समिती घरवालीची भेट घेऊन तिला तो द्यायला लावायची. किंवा जर मालक (लैंगिक कामगार किंवा घरवालीचा जोडीदार) स्वतःला फुकट लैंगिक सेवा देण्याकरिता त्रास देत असेल, जे ते पूर्वी नेहमी करीत असत, तर या समित्या हस्तक्षेप करीत. कोणताही त्रास झाला तर दाद मागायला जाण्याचे हे एक ठिकाण बनले, ज्यात कर्जाकरिता वेठबिगारीचा देखील समावेश होता, जी घरवालीपेक्षा स्थानिक जाती-आधारित सावकारांमुळे अधिक चालू होती. आज या समित्यांच्या हस्तक्षेपामुळे व्याजाचा दर सावकारांकडून न ठरवला जाता तो स्त्रियांकडून ठरवला जातो.*

**मीना शेषु, संग्राम**

[35] उदाहरणादाखल पहा: ह्युमन राईटस वॉच मध्ये वर्णन केलेली एक घटना: 'ह्युमन राईटस अब्युझेस लिंक्ड टू एचआयव्ही/एड्स आउटरीच टू विमेन इन प्रोस्टीट्युशन', इन एपिडेमिक ऑफ अब्युज: पुलिस हरासमेंट ऑफ एचआयव्ही/एड्स आउटरीच वर्कर्स इन इंडिया, ह्युमन राईटस वॉच, २००२, रिट्रीव्हड ६ ऑगस्ट २०१७, https://www.hrw.org/reports/2002/india2/india0602-05.htm

*त्या काळात आम्हाला केवळ पोलीसांकडूनच नाही तर स्थानिक दलित व आंबेडकरी[36] संघटनांकडूनही खूप त्रास व्हायचा जे आमच्याकडून पैसे तर घ्यायचे पण आम्हाला त्यांच्या कार्यक्रमात घ्यायचे नाहीत. स्थानिक गुंडांप्रमाणेच आम्हाल स्थानिक राजकीय नेते व पोलिसदेखील आम्हला दिवसा त्रास द्यायचे व रात्री फुकट लैंगिक काम करून घ्यायला यायचे. आता फक्त दादागिरी थांबली एवढेच नाही तर आता आजूबाजूचा समाज दाद मागायला आमच्याकडे येतो!! आम्हाला आता कायद्याची चांगली माहिती झाली आहे आणि आमच्या हक्कांकरिता आम्ही व्हॅम्प आणि संग्रामच्या मदतीशिवायदेखील भांडू शकतो. आणि ज्या बाबी आम्हाला आमच्या पातळीवर सोडवता येत नाहीत तेवढ्याच आम्ही त्यांच्याकडे मदतीकरिता घेऊन जातो.*

**मिरजेतील केंद्रीक गटचर्चा सहभागी**

**अधिकारीवर्गाबरोबर एका क्षीण सामंजस्याची बांधणी**

सहभागींमध्ये या विषयावर एक सर्वसाधारण मान्यता होती की पोलिसांकडून होणारी हिंसा, ज्यात घाऊकपणे घातलेल्या धाडीही आल्या, एकंदरीने कमी झाली आहे. सुरुवातीच्या काळामध्ये पोलिसांचे दृष्टीकोन बदलण्याकरिता आणि कायद्याचा हिंसक व गैरवापर थांबविण्याकरिता ज्या प्रचंड प्रमाणात काम केले गेले त्याला याचे श्रेय द्यावे लागेल. संग्राम व व्हॅम्प ने मोहिमा, जनजागृती कार्यक्रम, समर्थन, कायदेविषयक माहितीचे कार्यक्रम हे स्थानिक पातळीपासून ते जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतही चालविले. परिणामी, आज पोलीस कायद्यातील बारकाव्यांविषयी अधिक सजग आहेत तसेच अंतर्गत हिंसा हाताळण्याकरिता संघटना करीत असलेल्या कामाचीदेखील त्यांनी योग्य ती दाखल घेतली आहे. व्हॅम्प व पोलीस यांच्यामध्ये बऱ्यापैकी स्थिर, कदाचित काहीसे अवघडलेले, असे कामापुरते नाते निर्माण झाले आहे.

अर्थात हेही नमूद केले पाहिजे की लैंगिक कामगारांचा लैंगिक काम करण्याचा हक्क पोलीस मान्य करीत असले तरी ही मान्यता त्यांच्या हक्कांबद्दल असलेल्या आदरामुळे मिळालेली नाही तर अनेक स्त्रियांच्यादेखील स्वतःबद्दल असलेल्या दृष्टीकोनाशीच पोलीस देखील सहमत आहेत ज्यात त्यांना असे वाटते की त्या करीत असलेल्या कामामुळे "सर्वसाधारण" स्त्रियांचा लैंगिक पिसाटांपासून बचाव होतो.

आम्ही भेट घेतलेले पोलीस अधिकारी, डेप्युटी सुपरइंटंडन्ट पत्की म्हणाले त्याप्रमाणे :

*पोलीस असण्यापेक्षा अधिक मी एक सामाजिक कार्यकर्ता आहे. जोवर ते रस्त्यावर होत नाही व घरांमधून केले जाते आहे तोवर मला लैंगिक कामाविषयी कोणतीही हरकत नाही. आणि हो, "सर्वसाधारण" स्त्रिया लैंगिक पिसाटांच्या तावडीतून मुक्त राहू शकतात करण या स्त्रिया त्या पिसाटांची लैंगिक भूक भागवत असतात. लैंगिक कामगारांना सुरक्षित व आश्वस्त वाटणे गरजेचे आहे व जोवर त्या आम्हाला वस्तीत चालणारी अधिक गंभीर गुन्हेगारी हाताळण्यास मदत करत आहेत तोवर आम्हीदेखील त्यांना कोणताही त्रास देणार नाही. उदा. अल्पवयीन मुली धंद्यात आणल्या जाणे किंवा मानवी वाहतूकीद्वारे लैंगिक कामात व्यक्ती आणणे.*

अर्थात ही मान्यता तकलादू तसेच अटींवर आधारलेली व केंव्हाही मोडून पडू शकेल अशी आहे, जशी ती २०१६ मध्ये मिरज येथील प्रेमनगर या लाल बत्ती विभागातील "स्वच्छता मोहिमे" च्या वेळी पडली, जेव्हा लैंगिक कामगारांना त्यांनी त्यांच्या घरांबाहेरील रस्त्यावर बसणे थांबवावे म्हणून मारहाण केली गेली.

---

[36] मागासलेल्या जातींच्या संघटना ज्या अनेकदा स्वतःला डॉ.आंबेडकरांशी संबंधित नाव देतात, जे भारतीय संविधानकार असून स्वतः दलित होते.

प्रेमनगर ही जवळपास ३०० घरांची लाल बत्तीची वस्ती मिरज-कोल्हापूर हायवेवर वसलेली आहे, म्हणूनच कदाचित तिच्यावर पोलिसांचं विशेष लक्ष गेलं. या वस्तीतील स्त्रिया दिवसभर रस्त्याच्या कडेला खुर्च्या टाकून बसायच्या. त्यात ताजी हवा खाण्याचा हेतू असायचा तसा गिऱ्हाईक मिळविण्याचाही. पोलीस अधीक्षक श्रीमती पत्की, कामाकरिता या रस्त्यावरून अनेकदा ये-जा करायच्या तसेच हा रस्ता अनेक महत्वाच्या व्यक्तींचा नेहमीच्या येण्याजाण्याचा रस्ता होता. या स्त्रियांचे रस्त्यावर बसणे त्यांना अतिशय खटकले व नोव्हेंबर/डिसेंबर २०१६ मध्ये त्या पोलीस घेऊन आल्या, त्यांनी खुर्च्यांची मोडतोड केली आणि स्त्रियांना अतिशय शेलक्या शिव्या दिल्या व अशा प्रकारे उघड्यावर व रस्त्यावर न बसण्याची सक्त ताकीद दिली. या स्त्रियांनी हा प्रश्न लावून धरण्याचे ठरविले व त्या मीना शेषु व संग्राम कडे गेल्या, ज्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत ही बाब पोहोचविली. अखेर हा मामला शांतपणे मिटला जेंव्हा श्रीमती पत्कींनी या स्त्रियांना हळदी कुंकू समारंभाला बोलावले व त्यांच्याशी सलोखा केला.

समुदाय-आधारित संघटन पद्धतीमध्ये सामुदायिक रूढी व पद्धतींचा वापर केला जातो ज्यातील अधिकार हाताळण्याच्या पद्धती जितक्या आदरपूर्ण असतात तितक्याच त्या संघर्षात्मक देखील असतात हे लक्षात घेण्याजोगे आहे. उदाहरणार्थ, वरील प्रसंगात, जिथे हळदीकुंकू हे सर्वसाधारणपणे "चांगल्या" स्त्रीचे द्योतक असते, त्याचा सोयीस्करपणे सलोखा करण्याकरिता वापर करून पोलीस अधिकारी स्त्रीने ते प्रचलित समजाप्रमाणे "वाईट" किंवा "दुसऱ्या" असलेल्या स्त्रीला देऊ केले. स्वतःच्या परिघावरील स्वायत्त स्थानामध्ये स्वतःला घट्ट रोवून व ते जराही न सोडता "सर्वसाधारण" पणाच्या प्रचलित व्याख्येला स्वतःच्या अटींनुसार हाताळत या स्त्रियांनी उलट ती व्याख्या अधिक व्यापक व समावेशक केली आहे. असे करताना त्या कदाचित मुख्य धारेतील आचारविचारांविरुद्ध बंडखोरी देखील करत असतील. यामुळे कदाचित त्या त्यांच्याविषयी असलेल्या साचेबद्ध व मागासलेल्या प्रतिमांना पुष्टीच देत असण्याचीही शक्यता आहे. पण तरीही परीघांवरील समुदाय व सत्तेची केंद्रस्थाने यांच्यामध्ये एक सामायिक अवकाश व समज निर्माण होण्याकरिता ही वाटाघाटीची प्रक्रिया कठीण असली तरीही अटळ असते व निरंतर चालू राहते.

**येणाऱ्या पिढीकरिता पर्यायांच्या कक्षा रुंदावणे**

व्हॅम्प ने जिथे आपली पाळेमुळे घट्ट रोवली आहेत त्याच समुदायाच्या संदर्भ चौकटीमध्ये स्त्रियांचे संघटन झाले आहे, व तिथे त्यांची दीर्घकालीन व पिढ्यानपिढ्या झालेली गुंतवणूक आहे, त्यामुळे त्यांच्या परिस्थितीशी व सत्यतेशी समर्पक असा बदल व परिवर्तनाचा अधिक शाश्वत दृष्टीकोन वाढीस लागणे शक्य झाले आहे. व्हॅम्प च्या सभासदांमध्ये समुदायातील मुलांच्या भवितव्याविषयी काळजी स्पष्ट दिसून येत असली तरीही त्यांनी स्वतः ज्या आयुष्याची निवड केली आहे त्याविषयी त्यांना खेद वाटत नाही किंवा त्यांच्या मुली जे निवडतील त्याविषयीही त्यांच्या मनात कोणतेही पूर्वग्रह नाहीत. या सूक्ष्म जाणिवेमुळेच संग्राम व व्हॅम्प ने लैंगिक कामगारांच्या मुलांसोबत काम करण्याचा निर्णय घेतला, व त्यांचा आत्मसन्मान, आत्मविश्वास व ज्ञान वाढेल असे कार्यक्रम हाती घेतले. हे कार्यक्रम मुलांना उपजीविकेच्या अधिक संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने यशस्वी ठरले, परंतु अशा प्रकारे समुदायातून "बाहेर पडण्या"मध्ये कुठेही, नीतिमत्तेच्या दृष्टीकोनातून राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांमध्ये असते तशी, शरम किंवा पूर्वग्रहदूषित भावना नव्हती.

**देवदासी व अल्पवयीन**

संघटनांच्या प्रभावामुळे मुलींना लहान वयातच देवीला अर्पण करण्याच्या देवदासी नामक रुढीमधेही घट झाली आहे. अनेक देवदासी आपली मुले देवीला न वाहण्याविषयी जागरूक आहेत, व त्यांना उपजीविकेची अन्य साधने उपलब्ध व्हावी याकरिता शिक्षणही देत आहेत. अर्थात हा प्रवास देखील खडतरच राहिलेला आहे.

मीनाच्या आठवणीप्रमाणे : "होय, लहान मुलींना या व्यवसायात आलेले पहाणे अतिशय त्रासदायक होते व त्याहूनही त्रासदायक होते ते त्यांना लहान वयातच एचआयव्हीचा बळी झालेले पहाणे. परंतु ही रूढी इतकी घट्ट व सर्वमान्य होती की त्या विरोधात काही बोलणे अशक्यच होते. आम्ही देवदासींमध्ये एक मोहीम राबवली ज्यात आम्ही त्यांना म्हणत होतो की तुम्हाला तुमच्या मुलींना लैंगिक कामातच घालायचे असेल तर निदान त्यांना पाळी यायला लागेपर्यंत तरी वाट पहा. याकरिता मला खूप टीका सहन करावी लागली कारण लोकांना वाटत होते के असे म्हणणे क्रूरपणाचे व लैंगिक कामास उत्तेजन देणारे आहे. पण देवदासी हे म्हणणे देखील उडवूनच लावत होत्या. मग मी त्यांना विचारू लागले की तुमच्या आयुष्यातील सर्वात तापदायक काळ कोणता होता तेव्हा अनेकांनी "मी लैंगिक संबंध सुरु केले तेव्हाचा" असे सांगितले. त्यावर आम्ही त्याचे कारण काय हे सांगण्याकरिता त्यांचा पिच्छा पुरवायचो व त्यांनी दिलेले उत्तर त्यांच्याकडेच परतवून मग हेच तुमच्या मुलींना पण व्हावे असे तुम्हाला वाटते का असे विचारायचो. स्त्रियांनी याला सकारात्मक प्रतिसाद दिला हे त्यांचेच श्रेय आहे व अखेर अनेक चर्चांनंतर व दहा वर्षांच्या अथक, पुर्वाग्रहरहित व अविरतपणे केलेल्या प्रयत्नांनंतर व्हॅम्प काम करत असलेल्या ठिकाणांमध्ये लहान मुलांना धंद्यात आणण्याच्या पद्धतीचे या समुदायाने उच्चाटन केले."

आमच्या क्षेत्र भेटींचा भाग म्हणून आम्ही सुवर्ण नावाच्या देवादासीला भेटलो जिला मी पहिल्यांदा अनेक वर्षांपूर्वी भेटले होते. आम्हाला पाहून तिला अतिशय आनंद झाला आणि तिने अगत्यपूर्वक आम्हाला तिच्या घरी नेऊन शल्लव्वा व माला या तिच्या सहयोगींशी ओळख करून दिली. महालिंगपुरा या तिच्या गावामध्ये देवादासींचे वर्चस्व आहे. वर म्हटल्याप्रमाणे देवदासी पद्धतीविषयी अनेक प्रवाद आहेत. प्रस्थापित समाजाच्या दृष्टीने अर्थातच ही पद्धत नितीमत्ता धुळीत मिळविणारी आहे. जवळजवळ सर्वच देवदासी गरीब व दलित समुदायातून आलेल्या असल्यामुळे दलित संघटनांच्या दृष्टीने ही पद्धत म्हणजे जात व लिंगभाव आधारित भेदभावाचे एक लाजिरवाणे प्रतिक आहे. संग्राम व व्हॅम्प यांचा दृष्टीकोन अधिक सूक्ष्म जाणीवेतून निर्माण झालेला आहे, व त्यांचे निरीक्षण असे आहे की परंपरेने व आजदेखील प्रत्यक्षात देवदासी ज्या व्यापक समुदायाचा भाग आहेत, त्या समुदायामध्ये त्यांना इतरांपेक्षा अधिक चांगला दर्जा दिला जातो. ज्याप्रमाणे उच्च जातीतील विवाहित स्त्रिया आपल्या घरांच्या चार भिंतीत कोंडलेल्या असत त्याउलट या स्त्रिया नेहमीच सामाजिक व्यवहारांमध्ये भाग घेऊ शकत होत्या व समुदायातील बाबींविषयी आपले विचार व्यक्त करू शकत होत्या. आजही ज्या मुली व स्त्रिया देवीला अर्पण केल्या जातात त्यांना पुरुषांसारखाच दर्जा दिला जातो व त्यामुळे त्यांना कौटुंबिक मालमत्तेत वारसाहक्क देखील मिळतो[37].

अन्य बाबींसोबतच सुवर्णा, शल्लव्वा व माला यांनी त्यांच्या व्यवसायात व पद्धतींमध्ये झालेल्या प्रचंड बदलाबद्दल देखील सांगितले. त्या म्हणाल्या की पूर्वी देवदासी झालेल्या अनेक मुलींची बालवयातच मोठ्या शहरांमध्ये वेश्या व्यवसायाकरिता वाहतूक केली जायची हे खरे आहे. अनेकजणी रोग झालेल्या व मोडून पडलेल्या अवस्थेत आपल्या गावी येऊन मृत्यू पावत. पण आता त्यात बदल झाला आहे कारण मुली अधिक

[37] मीना शेषु बरोबर झालेले संभाषण

स्वतंत्र व कणखर व आपल्या हक्काबद्दल जागरूक झालेल्या आहेत व आपल्या आरोग्याची जबाबदारी त्या स्वतः घेऊ शकतात.

एकीकडे जाणीवजागृती वाढल्याने देवीला वहायल्या जाणाऱ्या व वेश्याव्यवसायात शिरणाऱ्या मुलींचे वय वाढते आहे. तर दुसरीकडे देवदासींची मुले अनेकदा या व्यवस्थेतून बाहेर पडून शिकून अन्य व्यवसायात जाण्याची निवड करतात. उदा. मालाच्या दोन मुलींपैकी एकीचे लग्न झाले आहे तर दुसरी शिक्षिका आहे. सुवर्णाची मुलगी देखील पदवीधर असून सरकारी नोकरीकरिता प्रयत्नशील आहे. सध्या ती स्थानिक सहकारी शेती संस्थेत काम करते.

आम्ही निघताना सुवर्णाने आम्हाला तिने स्वतःच्या पैशातून तिच्या सर्व मुलांकरिता बांधून दिलेली घरे पाहून जाण्याचा आग्रह केला. तिच्या अनेक वर्षांच्या "मालाकां"विषयी तिच्या मनात अपर कृतज्ञता आहे ज्यांनी स्वतःचा संसार असतानादेखील स्वतंत्र व सन्मानाचे आयुष्य जगण्याच्या तिच्या प्रयत्नांमध्येतिला खंबीरपणे साथ दिली.

देवदासींचे हक्क, आरोग्य व जीवनमान सुधारण्याची व्हॅम्प कार्यपद्धती ही या स्त्रियांचे सबलीकरण व सन्मान करण्याच्या तत्वावर आधारलेली आहे, त्यांना निर्बल करण्यावर किंवा त्यांचे अधिक वस्तूकरण करण्यावर नव्हे. सुवर्णा, शल्लव्वा व माला व त्यांची मुले ही या कार्यपद्धतीच्या दीर्घकालीन परिणामाची चालती बोलती उदाहरणे आहेत.

### लैंगिक कामगारांसामोरील आव्हाने

पोलिसांकडून होणाऱ्या हिंसेचा लैंगिक कामगारांना जाणवणारा कायमचा धोका व कायद्यात हवे असणारे बदल याखेरीज त्यांच्या संघटनेला भेडसावणारी नवीन आव्हाने ही केवळ उन्मूलनवाद्यांकडून जाणवणारी नसून स्त्रीवादी व दलित चळवळी सारख्या अधिक प्रगतीशील क्षेत्रांतून देखील जाणवतात. आणि गंमत म्हणजे, या निद्रिस्त नितीमत्ता नेमक्या तेव्हाच डोके वर काढू लागल्या जेव्हा शासकीय व्यवस्थेमध्ये लैंगिक कामगारांच्या हक्क व परिस्थितीविषयी किंचित अधिक जाणीव व संवेदनशीलता निर्माण होऊ लागली.

### उजव्यांकडून पुनःगुन्हेगारीकरण व पुनःवसाहतीकरण

पोलिसांचा दृष्टीकोन जरी लैंगिक कामगारांचे हक्क व परिस्थिती स्वीकारण्याविषयी थोडा मवाळ होत असला तरी उन्मुलनवादी गट मात्र सतत सरकारवर निष्ठुरपणे धाडी, सुटका व पुनर्वसन मोहिमा राबविण्याकरिता दडपण आणीत असतात. जरी यातील सर्वात कठोर धाडी व्हॅम्प च्या कार्यक्षेत्रामध्ये २००५ ते २००७ च्या दरम्यान घालण्यात आल्या असल्या तरीही त्यांचे मानसिक व संघटनात्मक पडसाद आजही जाणवतात. म्हणूनच खाली दिलेली घटना त्यांनी त्यांच्या संघटनात्मक इतिहासातील एका लक्षणीय टप्प्याचे प्रतिनिधित्व करणारी असण्याकरिता तिची निवड केली.

### "गोऱ्या"चे पुनरागमन

"लहान मुले व गरीबांतील गरिबांना न्याय पुनःप्राप्त करून देण्याकरिता आम्ही धाडसी पद्धती वापरतो" अशी घोषणा "रिस्टोर इंटरनॅशनल" नामक ख्रिस्ती तत्वज्ञानावर आधारित असलेली व अमेरिकेच्या मदतीवर चालणारी संस्था आपल्या संकेतस्थळावर करते. त्यांची भागीदार असलेली फ्रीडम फर्म ही संस्था

स्वतःचे वर्णन, भारतीय अल्पवयीन मुलींची वेश्याव्यावासायातून सुटका करणारी, “ख्रिस्ताकडे त्यांची पुनःस्थापना करणारी” व गुन्हेगारांना शासन करणारी संस्था असे करते[38].

२००३ मध्ये अमेरिकेतील पेपफार, अध्यक्षांच्या आपत्कालीन एड्स मुक्ती कार्यक्रमास {PEPFAR (President’s Emergency Programme for AID Relief)} निधी वर्ग करणाऱ्या कायद्यामध्ये अशी अट होती की एचआयव्ही/एड्स चे कार्यक्रम राबविण्याकरिता अमेरिकी सरकारची मदत घेणाऱ्या संस्थांनी APLO-Anti-Prostitution Loyalty Oath - वेश्याव्यवसायविरोधी निष्ठेची शपथ घेतली पाहिजे.[39]

संग्रामला पूर्वीपासून AVERT संस्थेद्वारे USAID चा निधी मिळत असला तरी त्यांनी ही शपथ घ्यायचे नाकारले व त्यामुळे त्यांचा सहयोग २००५ मध्ये परस्परसंमतीने संपुष्टात आला.[40]

जरी अमेरिकी राजदुतालयाने एका पत्राद्वारे हे आरोप खोटे असून अमेरिकी मदत न घेण्याचा निर्णय हा परस्परसंमतीने घेण्यात आला असून व यात कुठेही मानवी वाहतुकीच्या आरोपाचा संबंध नव्हता असे स्पष्टीकरण दिले होते तरीही अमेरिकी मदत घेणाऱ्या संस्थांनी संग्राम मानवी वाहतूक करत असल्याचे खोटे आरोप केले.[41]

परंतु मीनाने पुनरुच्चार केल्याप्रमाणे “एचआयव्ही/एड्स करिता मिळत असलेला सज्जड निधी व “सुटके”च्या मानसिकतेचा वेश्याव्यवसायावरील अंमल असलेल्या वातावरणात, संग्रामच्या सुप्रसिद्ध असलेल्या कामाला लक्ष्य करण्यात आले”.

*निधी देणाऱ्यांनी आम्हाला सांगितले की आम्हाला लैंगिक काम थांबवावे लागेल व आमचे पुनर्वसन केले जाईल. आम्ही त्यांना सांगितले की असा निधी आम्हाला नको आहे आणि आम्ही तो परत पाठविला आणि म्हटले की आमच्या स्त्रियांची आणि आमच्या संस्थेची काळजी कशी घ्यायची ते आम्हाला कळते. आज आम्हाला चर गिऱ्हाईक मिळत असले तरी उद्या आठ मिळू शकतात हे आम्हाला माहित असते. मग एके दिवशी काही न कळविता एक गोरा माणूस अचानक समुदायामध्ये आला व म्हणू लागला की त्याला मुलांना चॉकलेटे वाटायची आहेत. आणि विचारू लागला की प्रत्येक घरात किती मुले आहेत व कोणत्या वयाची आहेत. आम्हाला नंतर कळले की तो ग्रेग माल्स्टेड होता.*

**सांगलीतील केंद्रीक गटचर्चा सहभागी**

मे २००५ मध्ये ग्रेग माल्स्टेड व इंटर इंटरनॅशनल जस्टीस मिशन व रिस्टोर इंटरनॅशनलशी संबंधित अन्य व्यक्तींनी, अल्पवयीन मुलींना धंद्याला लावल्याच्या कारणावरून सांगलीतील, संग्रामच्या जन्मभूमीमधील, वेश्यागृहांवर हिंसक धाडमोहीम टाकण्यास पोलिसांना उद्युक्त केले. स्त्रियांना मारहाण करण्यात आली

---

[38] एम.गुप्ते व इतर, इन दि नेम ऑफ रेस्क्यू : अ रिपोर्ट ऑफ दि फॅक्ट फाइंडिंग कमिटी इन्व्हेस्टीगेशन इनटू अलेज्ड मॉलेस्टेशन/रेप ऑफ अ मायनर गर्ल बाय अ डिकॉय कस्टमर इन उत्तमनगर, मिरज,महाराष्ट्र, १२ मे २००७ .

[39] CHANGE-सेंटर फॉर हेल्थ एंड जेन्डर इक्वालिटी, अँटीप्रॉस्टिट्युशन लॉयलटी ओथ, फॅक्ट शीट, २०१५, http://www.genderhealth.org/files/uploads/change/publications/Updated_APLO_factsheet.pdf

[40] मीना शेषुशी मुलाखत

[41] गुप्ते

आणि बंदुकींची भीती दाखविण्यात आली, ७० पेक्षा अधिक पोलिसांनी दरवाजांवर लाथा मारून त्यांचे सामना इतस्ततः भिरकावले.

*रात्रीचे १२-१२.३० वाजले असतील, स्त्रिया इकडे तिकडे धाव घेत होत्या, भिंतींवरून उड्या मारत होत्या. पोलिसांनी प्रत्येक गल्लीत धाड घातली. आम्ही दहशतवादी असल्याप्रमाणे आमचा माग घेतला. जवळपास १०-१२ गाड्या होत्या आणि त्यांनी स्त्रियांना केसाला धरून ओढत नेले व अत्यंत घाणेरड्या शिव्या देत होते – भोसडी, छिनाल, रंडी, आणि आम्ही ओरड्ल्यास आम्हाला मारहाण करीत होते. काहीजणी पळून गेल्या. आजही, जवळजवळ १२ वर्ष झाल्यानंतरही, ती घटना आठवली तरी आमचा थरकाप उडतो.*

**सांगलीतील केंद्रीक गटचर्चा सहभागी**

जवळपास ३५ स्त्रियांना अटक करून बळजबरीने त्यांची वैद्यकीय चाचणी केली गेली. अखेर १८ वर्षांहून कमी असलेल्या केवळ २ मुली सापडल्या. आणखी २ अल्पवयीन मुली उन्हाळयाच्या सुट्टीत त्यांच्या आईला भेटण्याकरिता आलेल्या होत्या परंतु त्यांनादेखील दोन आठवडे विनाकारण पकडून ठेवण्यात आले.

*माझी बहिण धंदा करत नव्हती पण तीही अल्पवयीन होती आणि आमच्या आईकडे राहत होती म्हणून तिलाही ते घेऊन गेले. त्यांनी मला पकडून नेलं आणि मारहाण केली कारण त्यांच्यामते मी आमच्या लक्ष्यवेधी हस्तक्षेप कार्यक्रमात*[42] *निरोध वाटत होते म्हणजे धंदा करण्यास उत्तेजन देत होते. मी त्यांना सांगायचा प्रयत्न करीत होते की ती माझी बहिण आहे, पण तरी ते तिला घेऊन गेले. तिला याचा इतका धक्का बसला आहे की आता तिला लग्नही करायचं नाहीये आणि धंदाही. पण आता ती आमच्याबरोबर तंटा मुक्ती समितीमध्ये आहे.*

**सांगलीतील केंद्रीक गटचर्चा सहभागी**

*या धाडीचा दोन्ही अल्पवयीन मुलींवर खूप खोल परिणाम झाला कारण त्याला वृत्तपत्रे आणि टी.व्ही., दोन्हीवर खूप प्रसिद्धी दिली गेली आणि आता आपले नाव खराब झाले असेल व त्यामुळे आपल्याला पुन्हा शाळेत जाता येणार नाही आणि आपले भविष्यही खराब झाले असे वाटून त्या खूपच दुःखी झाल्या होत्या. अखेर एक मुलगी धंद्यात आली कारण तिला वाटले की आपले नाव आधीच खराब झाले आहे व दुसरीने कर्नाटकातील एक व्यक्तीशी लग्न केले. त्यांच्यापैकी एकीने आत्महत्येचा प्रयत्न देखील केला.*

**सांगलीतील केंद्रीक गटचर्चा सहभागी**

*तीन दिवस आम्ही पोलीस स्टेशन समोर धरणे धरले होते. आम्ही ना स्वयंपाक केला ना झोपलो. एवढ्या भ्यायलेल्या होतो आम्ही की हे काही करणे शक्यच नव्हते. स्त्रिया आणि मुली ३ महिने रिमांड होम मध्ये होत्या आणि आपल्याला जबरदस्तीने धंद्यात आणले आहे असे त्यांच्याकडून वदवून घ्यायला त्यांचे सारखे समुपदेशन केले जायचे. आणि मुली सतत हेच म्हणत राहिल्या की आम्ही आमच्या मर्जीने धंदा करत आहोत.*

**सांगलीतील केंद्रीक गटचर्चा सहभागी**

---

[42] पहा: इंडिया एचआयव्ही/एड्स रिसोर्स सेंटर : टार्गेटेड इंटरव्हेन्शन्स, http://www.indiahivinfo.naco.gov.in/naco/targeted-interventions

पुढे त्याच वर्षी, रीस्टोर इंटरनैशनलशी संबंधित दोन व्यक्ती पुन्हा सांगलीमध्ये आल्या आणि गिऱ्हाईक असल्याचे सोंग घेऊन पुन्हा त्याच वेश्यागृहात आल्या. काहीतरी काळेबेरे असल्याचा संशय येऊन काही तरुण लैंगिक कामगार मुली खूप चिडल्या आणि त्यांनी त्या लोकांना भरपूर मारहाण केली. काही प्रौढ लैंगिक कामगारांनी मध्ये पडून त्या लोकांना खूप गंभीर इजा होण्यापासून वाचवले. या घटनेमुळे आयजेएम व रीस्टोर इंटरनैशनल ने संग्राम विषयी आणखीनच बदनामीकारक अफवा पसरविल्या.

मे २००७ मध्ये या दोन संस्थांमधील एक गट पुन्हा सांगलीत आला व त्यांनी तेथील वेश्यागृहांवर धाडी घातल्या कारण त्यांना तिथे एका अल्पवयीन मुलीची तस्करी करण्यात असल्याची गुप्त खबर मिळाली होती. यातील विरोधाभास असा की त्यांच्या या “छुप्या हल्ल्या” नंतर, ज्यात यांतील एकाने पुन्हा गिऱ्हाईक असल्याचे सोंग आणले व समुदायांतील काहींच्या आरोपानुसार एका १३ वर्षीय बालिकेवर बलात्कार केला, या “सुटका” केलेल्या मुलीला पुन्हा तिच्या आईकडेच लाल बत्ती वस्तीतच पाठविण्यात आले करण तेथेच ती सर्वात जास्त सुरक्षित राहू शकेल असे पोलिसांना वाटले. व्हॅम्प च्या सदस्यांनी तिच्या आईशी अनेक पर्यायांची चर्चा करून अखेर त्या मुलीस पोलिसांद्वारे लहान मुलींकरिता असलेल्या सरकारी सुरक्षागृहात पाठविण्यात आले. अनैतिक मध्यम प्रसारातून या मुलीचा चेहरा सर्व प्रसारमाध्यमांमध्ये ठळकपणे प्रदर्शित केला गेला आणि जरी ती वेश्याव्यवसायात असल्याचा किंवा तिची वाहतूक झाल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नव्हता तरीही तिला “वेश्या” म्हणून प्रसिद्धी दिली गेली.

मीना व व्हॅम्प च्या सदस्य या दोन्हींच्या मते, केवळ प्रौढ स्त्रियांनी स्वेच्छेने वेश्याव्यवसायात असण्याला त्यांचा विरोध नसल्यामुळेच ख्रिस्ती संस्थांनी त्यांना लक्ष्य केले होते व त्यांच्यावर मानवी वाहतूक करत असल्याचे उघड आरोप केले होते.

या नाट्यपूर्ण, हिंसक आणि अतिप्रसिद्धी मिळालेल्या धाडींचा सांगलीच्या स्त्रियांवर अतिशय विपरीत परिणाम झाला. तोपर्यंत त्यांना केवळ कलंक व भेदभावास तोंड द्यावे लागत होते परंतु आता त्यांना स्वतःला गुन्हेगार ठरवले जात आहे असे वाटू लागले.

त्या असेही म्हणाल्या की या घटनेनंतर समुदायांतील स्त्रियांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावरदेखील गंभीर परिणाम झाले व त्यामुळे काही महिला मृत्यू ही पावल्या. शिवाय यामुळे समुदाय परक्या व्यक्तींकडे अधिकच संशयाने पाहू लागला व परक्या व्यक्ती सोंग आणलेले गिऱ्हाईकच असतील अशी भीती वाटू लागली.

*नुकतेच कुठे आमचे संघटन होऊन मुख्य धारेतील समाजाशी आमचे व्यवहार होऊ लागले होते तेवढ्यात पुन्हा एकदा गुन्हेगारीकरण होऊ लागले. समाज त्यांना “वाईट” समजतो हे स्त्रिया मान्य करू शकत होत्या. शबानाला लक्ष्य केलेल्या निपाणीच्या प्रसंगानंतरही खूप चर्चा झाली होती. स्त्रियांना हाकलून देऊन जमीनीचा ताबा त्यांचेच साथीदार असणाऱ्या तेथील स्थानिक नेत्यांना देऊ पहाणाऱ्या पोलिसांच्या कृत्यामागील तर्कदेखील त्या समजू शकत होत्या. पण त्यानंतर या बाहेरील संस्थांकडून फूस लावून झालेल्या धाडी पडेपर्यंत स्त्रिया कणखर बनल्या होत्या. लैंगिक कामांतर्गत व बाहेरूनही होणाऱ्या हिंसेची प्रकरणे आम्ही हाताळत होतो, पण मग धाडींमध्ये हा “गोरा” माणूस आला आणि आम्हाला “पापी” आणि “हीन” म्हणू लागला. याचा स्त्रियांवर अतिशय खोल परिणाम झाला, ज्यामुळे त्या गोंधळल्या आणि भयग्रस्त झाल्या. भिमव्वा, ही समुदायांतील एक पुढारी स्त्री, एका गोऱ्याने तिच्याकडे बोटे दाखवून तिच्या अंगावर ओरडून तिला “गुलामांची मालकीण” म्हटल्याचा तिला एवढा धक्का बसला की तिला रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करावे लागे.*

**मीना शेषु, संग्राम**

**डाव्या व अन्य प्रगतीशील चळवळीतून वगळले जाणे**

दुर्दैवाने लैंगिक कामगारांचे संघटन झाल्यानंतर त्यांना केवळ धार्मिकतेने प्रेरित असलेल्या संस्था संघटनांकडूनच नव्हे तर लैंगिक कामगारांच्या हक्कांकरिता लढणाऱ्या संघटनांशी मिळतीजुळती तत्वे व विचारसरणी असलेल्या प्रगतीशील संस्था संघटनांकडून देखील फटकारले गेले. यामध्ये काही स्त्रीवादी व दलित संघटनांचा समावेश आहे, ज्यांना असे वाटते की कोणत्याही स्वरूपातील लैंगिक कामाचे उच्चाटनच केले गेले पाहिजे, व लैंगिक कामगारांची स्वायत्तता व आत्मविश्वास हा त्यांना पुरुषप्रधानता व जातीयावादास पुष्टी देणाऱ्या एका खोट्या जाणीवेतून निर्माण झालेला वाटतो. लैंगिक कामास ते सामाजिक संरचनेमधील उच्चवर्णीय ब्राम्हणी वर्गाने दलित स्त्रीच्या शरीराचे व लैंगिकतेचे वस्तूकरण करून त्याचा वापर केल्याच्या चौकटीतून पाहतात.

लैंगिक कामगार व त्यांच्या संघटनांकडे कसे नैतिक व राजकीयदृष्ट्या कलंकित नजरेतून पाहिले जाते याची प्रचीती व्हॅम्प व मित्रा च्या सदस्यांना आमच्या क्षेत्रकार्यानंतर लगेचच आली. मार्च २०१७ मध्ये भारतातील वाढत्या एकाधिकारशाही विरोधात आयोजित केलेल्या एका मोर्चात या सदस्यांनी भाग घेतला होता. आम्हाला असे समजले की मोर्चानंतरच्या सभेमध्ये व्हॅम्प च्या सदस्यांनी भाषण केल्यानंतर, प्रेक्षक तसेच संयोजकांपैकी त्यांना बोलण्याची परवानगी दिल्याबद्दल अनेकांनी प्रक्षोभ व्यक्त केला, कारण त्या "गुन्हेगार" व "नैतिकदृष्ट्या हिणकस" होत्या. आणि ही सभा एकाधिकारशाही व असहिष्णुतेच्या विरोधात आयोजित केली होती, हा खरोखरीच विरोधाभास होता.

लैंगिक कामगारांच्या चळवळीसमोरील हे एक मोठे आव्हान आहे. एकंदरीत पाहिल्यास, जर उजव्या व डाव्या दोन्ही विचारसरणीच्या संघटनांनी सरकारवर दबाव टाकला तर पुन्हा एकदा सरकार लैंगिक कामाचे गुन्हेगारीकरण करू शकते, ज्यामुळे लैंगिक कामगारांनी चळवळीतून त्यांच्या आयुष्यातील हिंसेला त्यांच्या पद्धतीने हाताळून जे थोडेफार विजय मिळवले आहेत तेही धोक्यात येऊ शकतात.

**मानवी तस्करी ची व्याख्या करणे**

व्हॅम्प व संग्राम च्या सदस्यांशी झालेल्या चर्चा व मुलाखतींमधून हे स्पष्ट दिसते की मानवी तस्करी च्या कायदेशीर व्याख्येमध्ये जे घटक आहेत त्या सर्वांनाच त्या आपल्या कामाला सुरुवात केल्यापासूनच प्रतिसाद देत आहेत. यात विशेषकरून, वेश्याव्यवसायात आलेल्या अल्पवयीन मुली, फसवणूक करून मनाविरुद्ध आणलेल्या स्त्रिया आणि घरवाल्या, दलाल व गिऱ्हाईकांकडून त्यांचे होणारे शोषण व छळ, या बाबींचा समावेश आहे. जरी संग्राम ने सुरुवातीपासूनच ह्या बाबी बेकायदेशीर आहेत असे मानले होते, तरी प्रत्यक्षात जेव्हा व्हॅम्प ची निर्मिती झाली तेव्हाच समुदाय देखील या कृतींकडे हिंसा या दृष्टीकोनातून पाहू व प्रतिसाद देऊ लागला, ज्या तेव्हाही व आत्ताही शोषणात्मक व अन्यायाकारीच असून, त्यांची अशी व्याख्या ही स्त्रियांच्या नैतिकतेच्या व तत्वांच्या सामायिक जाणीवेतून केली गेली आहे, आणि म्हणूनच त्यांना अंतर्गतपणे हाताळणे गरजेचे आहे, केवळ मानवी तस्करी च्या कायदेशीर दृष्टीकोनातून नव्हे.

बदलणाऱ्या संदर्भांवर भाष्य करताना, मिरजेतील जुन्या पिढीतील लैंगिक कामगार असलेल्या कस्तुरीने केंद्रिक गटचर्चेत आम्हाला सांगितले, *"पूर्वी मानवी तस्करी होत नव्हती. स्त्रिया स्वतःच्या मर्जीने धंद्यात येत होत्या. तेव्हा दलालही नव्हते. लोकाल गुंड आमचे शोषण करू पाहत पण आम्ही प्रतिकार करत होतो. आता बाहेरून दलाल येतात. लहान मुलींना इथे आणून सोडतात आणि पैसे घेऊन जातात."*

उन्मुलनवादी गटांच्या दबावामुळे घातल्या गेलेल्या या धाडीच्या साखळीनंतरच हे प्रश्न आणि त्यासोबतच बांगलादेशसारख्या देशांमधून, सीमेपलीकडून, नोकरीचे आमिष दाखवून, कोणत्याही कायदेशीर कागदपत्रांशिवाय फसवून आणलेल्या मुलींचे प्रश्न हे मानवी वाहतुकीचा गुन्हा असून त्यात कायदेशीर

हस्तक्षेप आवश्यक असतो हे त्यांना जाणवू लागले. परंतु आजही, शोषणाची बहुतेक अंतर्गत प्रकरणे त्या स्वतःचा सोडविण्याचा प्रयत्न करतात, जोपर्यंत त्यात पोलिसांच्या कृतीशील हस्तक्षेपाची गरज पडत नाही.

*काहीवेळा घरवालीने अल्पवयीन मुलगी आणलेली आहे हे आम्हाला समजत नाही, जरी आता आम्ही आम्हाला कळविले गेले पाहिजे असा नियम केला आहे. तरी काहीवेळा त्या कळवत नाहीत, पण आम्हाला ते लक्षात आलं की आम्ही त्यांची भेट घेऊन त्यांना सांगतो की त्या चुकीचं काम करीत आहेत. तरीही त्यांनी ऐकलं नाही तर आम्ही पोलिसांची मदत घेतो आणि त्याचा मोठा गाजावाजा करतो. पूर्वी आम्ही असं करायला कचरायचो करण मग पोलीस पैशाची अपेक्षा करायचे, पण आता आमची संघटना झाल्यापासून तेही अधिक सहकार्य करतात. आता इथे कोणीही अल्पवयीन मुली नाहीत, सर्व १८ वर्षांच्या वर आहेत. माझी मुलगी १४ वर्षाच्या वयाला मुंबईला गेली, आजच्या परिस्थितीत तिला असे धंद्यामध्ये शिरणे शक्य झाले नसते.*

**कस्तुरी, लैंगिक कामगार, मिरज**

**अन्यायापासून ते गुन्ह्यापर्यंत: मानवी तस्करी स संघटनेचा प्रतिसाद**

झालेल्या चर्चा, मुलाखती व केसस्टडीज वरून हे स्पष्ट होते की संग्राम व व्हॅम्प कडून लैंगिक काम व मानवी तस्करी यांच्या संदर्भात कायदा कशा प्रकारे लागू होतो हे समजून घेण्याचा पद्धतशीर प्रयत्न करीत आहेत. एकीकडे लैंगिक काम हे स्वतःच्या मर्जीच्या व उपजीविकेच्या हक्काचा भाग आहे असे प्रतिपादन करीत असतानाच मानवी तस्करी हा गुन्हा असून त्याविरुद्ध समुदायामधून लढा देण्याची त्यांची तयारी आहे. त्या हे अनेक पातळयांवर करीत आहेत.

**१. कायदा भावनांनी नव्हे तर धोरणात्मकतेने हाताळणे**

मानवी तस्करी विरोधी व उन्मूलनवादी गटांकडून मिळालेल्या धक्क्यांवरून व्हॅम्प व संग्राम दोघांच्याही हे लक्षात आले की भावनिक प्रतिक्रिया न देता त्यांना धोरणात्मक पद्धतीने पुढे गेले पाहिजे. वकिलांची मदत घेऊन मानवी तस्करी विरोधी कायदा त्या स्वतःच्या तसेच कायदेशीर संदर्भात समजून घेण्याची पद्धतशीर प्रक्रिया करून लागल्या. या ज्ञानाच्या आधारे त्या समुदायामध्ये अल्पवयीन मुलींना आणणे तसेच घरवाल्या व दलालांकडून शोषण होणे, विशेषतः, अन्य राज्ये व देशांतून होणाऱ्या स्थलांतराच्या संदर्भात, याविषयी अधिक जागरूकतेने लक्ष ठेवू लागल्या. समुदायामध्ये नवीन दाखल होणाऱ्या मुलींचे वय तपासणे हे नित्याचे झाले आहे व अल्पवयीन असल्याचा संशय आल्यास त्याकरिता, सांगलीमध्ये, वयाची खात्री करण्याकरिता विवाद्य असलेली हाडांच्या घनतेची चाचणी सार्वजनिक रुग्णालयामध्ये करून घेतली जाते.

**२. समुदायस्थित संस्थांना हिंसेचा सामना करण्याकरिता बळकट करणे/ पुनर्वसनाची पुनर्व्याख्या करणे**

**तंटा मुक्ती समित्या**

जसजशी व्हॅम्प संघटना विकसित होऊ लागली, कोर्ट, पोलीस यासारख्या प्रस्थापित परंतु कट्टर आणि लैंगिक काम विरोधी संस्थात्मक संरचनांकडून न्याय मिळवताना अनेकदा त्यांना विफलता जाणवू लागली. त्यातूनच, संघटनेला जाणवणारे अंतर्गत तसेच बाह्य प्रश्न सोडविण्याकरिता एक जैविक व समुदायस्थित पर्याय म्हणून तंटा मुक्ती समित्यांची सुरुवात झाली. व्हॅम्प काम करत असलेल्या प्रत्येक समुदायामध्ये ही समिती अस्तित्वात असून त्यातील सदस्य विशिष्ट कालावधीकरिता निवडले जातात. या काळात ते नियमित बैठकींचे आयोजन करणे, स्थानिक

तंट्यामध्ये हस्तक्षेप करून त्यांचे निवारण करणे, पोलिसात तक्रारी दाखल करणे, हिंसक किंवा बळजबरी करणाऱ्या गिऱ्हाईकांना पोलिसांच्या ताब्यात देणे, उधारीने पैसे देणाऱ्यांचा माग घेऊन ते वाजवी व्याजदर लावतात याची खात्री करणे, यासारखी कामे करतात. तसेच समुदायात नवीन दाखल होणाऱ्यांचा माग घेऊन त्या सज्ञान असून स्वेच्छेने आलेल्या आहेत याची खात्री देखील ही समिती करून घेते. त्या एकत्र येऊन अंतर्गत हिंसेचा सामना कसा करायचा याविषयी ठरवतात, अर्थात कोणताही कायदा मोडणार नाही किंवा त्यांच्या हातून गुन्हा घडणार नाही याविषयी त्या सतर्क असतात. उदा. वेश्यागृहातील महिलांना स्वतंत्रपणे धंदा करण्यास उत्तेजन देणे ज्यायोगे त्या घरवालीच्या जुलुमाखाली राहणार नाहीत.
म्हणूनच या समित्या, समुदायास बाह्य समाजाच्या कलंकित व भेदभावात्मक दृष्टिकोनाचा सामना करण्याकरिता आवश्यक असलेला आत्मविश्वास बळकट करण्यामध्ये कळीची भूमिका निभावतात एवढेच नव्हे तर विविध स्वरूपांतील अन्यायांची व्याख्या त्यांच्या स्वतःच्या संदर्भात करून त्या अन्यायांशी  सामना करण्याची स्वतःची क्षमता देखील त्या वाढवत असतात.

आम्हाला सांगितलेल्या काही प्रकरणांतून (केस स्टडीज) मानवी तस्करीशी संबंधित प्रश्न, तंटा मुक्ती समित्या कशा प्रकारे हाताळतात, हे निर्देशित होते.

**केस स्टडी १ : राजस्थानातील मुलगी**

एप्रिल २०१६ मध्ये राजस्थानातील एक दलाल सांगलीतील एका गंगुबाई नावाच्या घरवालीच्या घरी एक १७-वर्षीय मुलगी घेऊन आला. ती अल्पवयीन असल्याचा  संशय येऊन, गंगुबाई तिला तंटा मुक्ती समितीच्या एका सदस्याकडे घेऊन गेली व तिचे वय सिद्ध करण्याची कोणतीही कागदपत्रे नसून तिला ठेवून घ्यावे का असे विचारू लागली. यावर समितीमध्ये चर्चा केली गेली व ती मुलगी खरोखरच खूप लहान दिसत असून या दलालाच्या हेतूबद्दल समितीला शंका वाटू लागली.
त्या सर्व मिळून गंगुबाईच्या घरी गेल्या. तो दलाल तिथेच होता. त्यांना येताना पाहून तो दलाल त्या मुलीला घेऊन मिरजेला पळून गेला, जे त्यांना त्याला मिरजेला सोडणाऱ्या टॅक्सीचालकाकडून समजले. यावर त्यांनी मिरजेच्या व्हॅम्प सदस्यांशी संपर्क साधला परंतु त्या त्याला पकडावयास गेल्या तेव्हा तो पुन्हा पळून गेला. जेव्हा समितीच्या सदस्या पोलिसांकडे तक्रार करण्यास गेल्या तेव्हा पोलिसांचा प्रतिसाद गुळमुळीत होता आणि समितीनेच त्या दलालाला पकडून पोलिसांकडे घेऊन यावे असे त्यांचे म्हणणे होते. अखेर समितीने त्यांना पळून जाण्यास मदत करणाऱ्या टॅक्सीचालकाला धमकावून त्यांचा पत्ता लावण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती मुलगी सापडली परंतु दलाल पुन्हा एकदा पळून गेला. मुलीशी बोलल्यावर असे दिसले की त्या दलालाने तिला घरवालीकडे आणण्याआधी कपड्यांच्या कारखान्यामध्ये नोकरी लावून देण्याचे आश्वासन दिले होते. ती मुलगी अल्पवयीन आहे याची खात्री केल्यानंतर तिच्या पालकांशी संपर्क केला गेला व मुलीसोबत त्यांचेही , प्रथम पोलीस ठाण्यात व नंतर रिमांड होममध्ये, जिथे त्या मुलीला नेले गेले, समुपदेशन करण्यात आले. जरी त्या मुलीने त्या दलालाचे नाव सांगण्यास नकार दिला तरी या कठोर कारवाईने तो दलाल इतका हादरला की तो पुन्हा या समुदायाकडे फिरकलाही नाही.

**केस स्टडी २ : बांगलादेशची शिल्पी**

शिल्पी ही, कोणतेही कागदपत्र नसलेली, बांगलादेशहून स्थलांतर केलेली तरुण मुलगी आपल्या एका मैत्रिणीबरोबर, जिने तिला कलकत्त्यामध्ये कपड्यांच्या कारखान्यात नोकरी लावायचे

आश्वासन दिले होते, आपले गाव सोडून निघाली. तिचे एका दारुड्या व हिंसक माणसाशी लग्न झाले होते व तिला एक ७ वर्षांची मुलगी होती जिला ती आपल्या आईवडिलांकडे सोडून आली होती. मैत्रिणीच्या मदतीने ती सीमेवरील अधिकाऱ्यांना गुंगारा देऊन भारतात दाखल झाली. त्या स्त्रीने तिला एका दलालाच्या स्वाधीन केले जो तिला सांगलीला घेऊन आला व एका घरवालीकडे तिला ठेवले. प्रथम तिला लैंगिक काम करावे लागेल याचा धक्काच बसला परंतु नंतर घरी पैसे पाठवण्याचा अन्य कोणताही चांगला पर्याय तिच्यासमोर नाही असे तिने ठरवले. कालांतराने तिने एका माणसाशी लग्नही केले व ते एकत्र राहू लागले, पण तिने धंदा सुरूच ठेवला.

तिच्या विभागात धाड पडल्यानंतर स्थानिक तंटा मुक्ती समितीच्या सहाय्याने तिने मदतीकरिता संग्रामशी संपर्क साधला. या धाडीमध्ये तिच्या दलालाच्या बायकोला अटक झाली होती व तीन अल्पवयीन बांगलादेशी मुलींना रिमांड होम मध्ये पाठवण्यात आले होते. बेकायदेशीर बांगलादेशी व्यक्तीला ठेवून घेतल्याबद्दल आपण अडचणीत येऊ या भीतीने तिच्या दलालाने व घरवालीने तिला बंगादेशात परत जाण्यास सांगितले. परंतु कुटुंबाला पैसे पाठवण्याची गरज असल्याने तिला परत जायचे नव्हते व परत गेल्यास बांगलादेशमध्ये तिला धंदा करता आला नसता कारण ते तिच्या कुटुंबियांना समजले असते. येथेच राहण्याचा मार्ग ती शोधत होती जरी तिला अधिकाऱ्यांकडून आणि दलालाकडून देखील धोका होता, कारण तो अर्थातच मानवी वाहतूक करीत होता.

शिल्पी व तिच्या नवऱ्याचे तंटा मुक्ती समिती व संग्राम या दोघांनीही समुपदेशन केले व तिच्या बेकायदेशीर दर्जाबद्दल तिला समजावून सांगितले. त्यांनी तिला सांगितले की सर्वप्रथम ती मानवी वाहतुकीची बळी होती कारण तिला फसवून येथे आणले गेले होते आणि दुसरे म्हणजे तिचे भारतातील आगमन किंवा येथील वास्तव्य कायदेशीर असल्याचे सिद्ध करणारे कोणतेही कागदपत्र तिच्याकडे नव्हते. तिसरे म्हणजे तिच्या दलालाकडून तिला धोका होता कारण जर ती धाडीमध्ये पकडली गेली तर नाईलाजाने तिला त्याचे नाव उघड करावे लागले असते. त्यांनी शिल्पी समोर दोन पर्याय ठेवले, एक म्हणजे तिचे सध्याचे लग्न कायदेशीर असल्याचा पुरावा तिने सदर करावा ज्यामुळे तिला त्याची पत्नी म्हणून इथे कायदेशीरपणे राहता आले असते, किंवा मग तिने परत जावे. जरी निवड करण्याचे स्वातंत्र्य त्या दोघांना होते, तरी अशा गुंतागुंतीच्या प्रकरणामुळे त्या स्त्रीस असलेल्या धोक्यांबद्दल तसेच संग्रामच्या नावाबद्दलही संग्रामचे सदस्य चिंतीत झाले होते.

*तिच्याशी बोलल्यानंतर आम्हा सर्वांची खात्री झाली की ती इथे स्वच्छेने राहत होती. अर्थात, ती परक्या देशातील होती, पण तीही आमच्यासारखीच इथे पोट भरण्यासाठी आली होती, मग आम्हाला तिला इथून जबरदस्तीने कसं परत पाठवता आलं असतं? पण ती या देशातील नसल्यामुळे आणि तिच्याकडे कोणतेही कागदपत्र नसल्यामुळे ती स्वतः अडचणीत आली असती आणि तिने आम्हालाही अडचणीत आणलं असतं. आमचंही नाव खराब झालं असतं. काय करावं हे आम्हाला कळेना.*

**माया, VAMP, सांगली**

*अशी "तस्करी" झालेली बांगलादेशी प्रकरणे आमच्यासमोर देखील आव्हान उभे करतात कारण आम्ही देखील आमची या प्रकरणांविषयीच्या आमच्या राजकीय समजेअंतर्गत हे समजून घेण्याचा संघर्ष करीत असतो की ही बाब "वाहतुकी"ची आहे की "असुरक्षित स्थलांतरा"ची. राजकीयदृष्ट्या आमची अशी भूमिका आहे की व्यक्तीच्या मुक्त आहारविहाराकरिता सीमारेषांच्या मर्यादा असू नयेत.आमची राजकीय समाज अशीही आहे, की लैंगिक काम हे काम आहे व त्याकरिता स्त्रियांना*

*कोठेही जाता आले पाहिजे, फक्त त्या सुरक्षित राहाव्यात. म्हणूनच योग्य कागदपत्रे नसलेल्या स्त्रियांना परत जाण्यास सांगणे आम्हाला कठीण जाते. जसं जेव्हा ही मुलगी आम्हाला म्हणते, "बरं, तुम्ही म्हणता म्हणून मी परत जाते, पण ते माझं मलाच करावं लागेल, आणि त्याकरिता मला या माणसाची मदत घेणं आवश्यक आहे कारण नाहीतर मी परत कशी जाऊ शकेन?" किंवा आणखी एका मुलीने मला म्हटलं होतं, "मला आणलेल्या दलालाची तक्रार मी कशी करू शकेन? जर मी तसं केलं, तर मी घरी पैसे कसे पाठवू शकेन? तो माझा मध्यस्थ आहे, त्याला पकडून तुम्ही माझे आणि माझ्या कुटुंबियांचे मरणच ओढवत आहात."*

**मीना शेषु, संग्राम**

**मित्रा व लैंगिक कामगारांच्या मुलांसोबत काम**

सुरुवातीपासूनच व्हॅम्प लैंगिक कामगारांच्या मुलांसोबतही काम करीत आहे कारण सदस्यांना याची जाणीव आहे की सामाजिक कलंक व भेदभावाचा त्यांच्यावर कसा परिणाम होतो, त्यामुळे त्यांच्यामध्ये प्रेरणेचा, आत्मसन्मानाचा अभाव असतो ज्याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि अखेर पुढील संधी व रोजगाराच्या निवडी मर्यादित राहण्यामध्ये होतो. मित्रा शाळा-पश्चात कार्यक्रम राबविते ज्यामध्ये लैंगिक कामगारांच्या वयाने मोठ्या असलेल्या मुलांकडे नेतृत्व असते व कळीची जीवनकौशल्ये शिकविण्याकरिता पहिला टप्पा म्हणून ते शाळेनंतरच्या वेळेत अभ्यासवर्ग घेतात. हे असे एक सुरक्षित अवकाश असते जिथे मुलांना केवळ भावनिक आधार व अभ्यासातील मदतच दिली जाते असे नाही तर त्यांना स्व-परीक्षण करून स्व-मूल्य व आत्मसन्मान मिळविण्याचे मार्ग शोधण्यास प्रेरित केले जाते. या कामातून मिरज, कराड व सांगली येथे अभ्यासकेंद्रांची तर २००८ साली निपाणी येथे मित्रा वसतिगृहाची स्थापना झाली. फक्त रस्त्यावर काम करणाऱ्या लैंगिक कामगारांच्या मुलांना आश्रय दिला जाणाऱ्या या वसतिगृहात आज ४० मुले आहेत. सर्वांना सरकारी शाळांमध्ये दाखल केले जाते व मित्राच्या शिक्षिका पूरक शिक्षण पुरवितात.

*जेव्हा आम्ही संग्रामचा ट्रक चालकांकरिताचा कार्यक्रम राबवीत होतो तेव्हा आमच्या लक्षात आले की ज्या लैंगिक कामगार रस्त्यावर धंदा करतात त्यांच्या मुलांची परिस्थिती फारच वाईट असते. उदाहरणार्थ, कराड येथील १० वर्षांचा दीपक हा मुलगा व त्याची ८ वर्षांची बहिण कोमल यांना घरात स्वयंपाक करणे व एकमेकांची काळजी घेणे हे स्वतःच करावे लागत असे करण त्यांची आई सतत फिरत असायची. आणखी एक १४ वर्षांची मुलगी होती जी एकटी तिच्या आईची काळजी घेत होती व दुसरी एक बाई तिला लैंगिक कामात ओढू पाहत होती. आम्ही तिला वसतिगृहात आणल्यावर तिने वाणिज्य शाखेची पदवी घेतली, मग ती प्रेमात पडली व तिने लग्न केले. पण तिने काम करून शिक्षण चालू ठेवले आहे.*

*मी स्वतः शिक्षण घेतलेले नाही. पण आमच्यातील लहान मुले शिकत आहेत आणि त्यांना इतर कामे करण्याच्या संधी उपलब्ध होऊ शकतात व त्यांना लैंगिक कामातच येण्याची सक्ती नाही हे पाहून खूप आनंद वाटतो. माझा स्वतः चे पुनर्वसन स्वतः करण्यावर विश्वास आहे. जेव्हा या स्त्रियांची मुले नोकरी करू लागतात व त्या लैंगिक काम सोडतात तेंव्हा ते एक प्रकारचे पुनर्वसनच नसते का?*

**महेश, लैंगिक कामगाराचा मुलगा, मित्रा**

### ३. शासकीय व्यवस्थांसोबत मानवी तस्करी संबंधी काम करणे

जरी लैंगिक कामगार व पोलीस यांच्यामध्ये पूर्वीपासूनच संघर्ष व अविश्वासाचे संबंध असले तरीही मानवी तस्करी चे प्रश्न हाताळण्यात त्यांच्यात वाढते सहकार्य दिसून येते. आम्ही ज्या पोलीस व न्यायव्यवस्थेतील प्रतिनिधींना भेटलो त्या दोन्हींनी लैंगिक कामगार व त्यांची मुले यांच्या अडचणी दूर करण्याकरिता तसेच वाहतूक करणाऱ्या व्यक्ती व त्यांचे जाळे यांच्या तपासात त्यांची मदत करण्याकरिता व्हॅम्प करीत असलेल्या कामाचे मनापासून कौतुक केले.

**पोलीस**

मानवी- तस्करी विरोधी कक्षाचे प्रमुख असलेले वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी त्यांचे या क्षेत्रातील काम तसेच व्हॅम्प व अन्य स्वयंसेवी संस्थासोबतचे त्यांचे काम याविषयी आमच्याशी सविस्तर चर्चा केली. लैंगिक काम व मानवी- तस्करी यांच्यातील फरक लक्षात घेऊन त्यांनी हे आग्रहाने सांगितले की लैंगिक काम करून रोजगार कमाविण्याच्या कोणत्याही स्त्रीच्या अधिकारामध्ये ते ढवळाढवळ करीत नाहीत. त्यांनी हे मान्य केले की धाड व सुटका करण्याची कृती ही अनेकदा विपरीत परिणाम करू शकते, विशेषतः जर अल्पवयीनांचे समग्र पुर्नवसन करणारी व त्यांना पर्यायी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारी कोणतीही योजना अस्तित्वात नसेल. थोडक्यात, काही अपेक्षित अपवादांसह जरी त्यांनी लैंगिक कामगारांचे अधिकार मान्य केले होते तसेच या समुदायाने मानवी वाहतूक विरोधी कामात त्यांच्याशी सहयोग करावा अशीही त्यांची स्पष्ट अपेक्षा होती.

*होय, मानवी तस्करी रोखण्याकरिता आम्ही लैंगिक कामगारांच्या संघटनांसोबत काम करणे महत्वाचे आहे. आम्ही एकमेकांना मदत केली पाहिजे. आम्हाला त्यांनी कसेही उचलून पुनर्वसन केंद्रांमध्ये डांबून ठेवायचे नाहीये. पण अशा काही बायका आहेत ज्या (एचआयव्ही) पोझिटिव्ह आहेत किंवा सुरक्षा साधने वापरत नाहीत व रोग पसरवू शकतात, अशांना सहाय्य व आश्रयाची गरज आहे. वयस्कर लैंगिक कामगारांचे प्रश्न देखील आहेत ज्यांना पोट भरण्याची एवढी भ्रांत आहे कित त्या वीस रुपयांसाठी देखील काहीही करायला तयार होतात आणि त्यामुळे लोक त्यांचे शोषण करतात व लुटतात. तर दुसरीकडे अशाही मुली आहेत ज्या पुणे, आसाम, उत्तर प्रदेश अशा लांबच्या ठिकाणांहून येतात, इथे अनेक वर्ष राहतात व आता त्यांचे चांगले चालले आहे. सरकार व स्वयंसेवी संस्थांनी वृद्ध लैंगिक कामगारांकरिता काहीतरी करणे गरजेचे आहे. तसेच अल्पवयीन व ज्यांना लैंगिक काम सोडवायचे आहे अशांकरिता देखील समग्र पुनर्वसनाचा अधिक चांगला कार्यक्रम तुम्ही आखला पाहिजे. करण त्यांना पर्याय दिले नाहीत तर त्या पुनः याच कामात परत येतील.*

**डेप्युटी सुपरीन्टण्डन्ट पत्की**

**कायदेशीर सहाय्य**

जिल्हा कायदेशीर सेवा मंडळ हे गरीब व वंचित समुहांना न्यायव्यवस्थेपर्यंत पोहोचणे सोयीचे जावे याकरिता सेवा देणारी संस्था आहे. यातील वकील, संग्राम मध्ये साप्ताहिक बैठकी घेतात ज्यामध्ये ते त्यांचे सामाजिक अधिकार, घरगुती हिंसा, मालमत्तेचे अधिकार, लहान मुलांची वाहतूक या विषयांवर सल्ला देतात. जि.का.से. मंडळातील हे काम करणाऱ्या ज्या वकिलांना आम्ही भेटलो त्यांनी आम्हाला सांगितले की त्यांच्या या कामात आजपर्यंत त्यांना एकही मानवी वाहतुकीचे

प्रकरण सापडलेले नाही. जि.का.से. मंडळात सेवा देणारे एक ज्येष्ठ बचाव वकिल, ॲड.मारुती माने, यांचीही आम्ही भेट घेतली. त्यांनी अनेक वर्षे व्हॅम्प व मित्रा सोबत काम केले आहे, त्यांच्या सदस्यांना पॅरालीगल प्रशिक्षण देण्याचे, तसेच इटपा च्या अंतर्गत गुन्हा दाखल केलेल्या लैंगिक कामगारांना कायदेशीर सहाय्य देण्याचे. ते साक्षीदार असलेल्या काही बदलांविषयी त्यांनी आपले मत मांडले.

ते म्हणाले की, सर्वप्रथम, या क्षेत्रात येणाऱ्या अल्पवयीनांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झालेली आहे. पूर्वी स्त्रिया शिक्षणाचा अभाव व गरिबी या कारणांमुळे आपल्या मुलांनाही या व्यवसायात आणत. व्हॅम्प व संग्राम ने लैंगिक कामगारांच्या मुलांना शिक्षणात आणून हा ओघ थांबविला. तसेच गेल्या काही वर्षात धाडी देखील पुष्कळच कमी झाल्या आहेत. आणि जेव्हा त्या होतात तेव्हा बहुतेक वेळा त्या परदेशी ख्रिस्ती संस्थांनी स्थानिक संस्थांच्या मदतीने कट करून, खोटी किंवा विपर्यस्त प्रकरणे नोंदवून उद्युक्त केलेल्या असतात. अशा धाडी प्रक्षोभक व तापदायक तर असतातच, परंतु अनेकदा त्यात अटक केलेल्या व खटले भरलेल्या स्त्रियांना, धाड घालताना योग्य ती कायदेशीर प्रक्रिया न पाळल्याच्या तांत्रिक कारणामुळे, नंतर सोडून दिले जाते, असेही माने यांनी सांगितले. माने म्हणतात की पोलिसांनी अशा प्रकारच्या तक्रारींबद्दल अधिक सतर्क व चिकित्सक बनले पाहिजे. त्यांना असेही वाटते की जरी न्यायसंस्था मानवी तस्करी च्या प्रकरणाबद्दल अतिशय कठोर भूमिका घेत असली तरीही त्यांनी आजवर ज्या ज्या न्यायालयांमध्ये काम केले आहे त्यातील एकातही त्यांनी वाहतूक करणाऱ्या व्यक्तीला अटक झालेली पाहिलेली नाही. त्यांना असे मनापासून वाटते की वाहतूक करणाऱ्यांविषयी कायद्यात अधिक कठोर तरतुदी करणे आवश्यक आहे.

## ४. नोंदी करणे व माध्यमातून प्रसार

रचनाबद्ध अभ्यासांव्यतिरिक्त. त्यांचे काम व त्यामागील विचारसरणी याविषयी जाणीव जागृती वाढविण्याकरिता, व्हॅम्प व संग्राम ने अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. यापैकी काही :

**--- पर्वताची कन्या – वाहतूक होऊन परत आलेली** --- लैंगिक कामगारांच्या संघटनेने काढलेले एक कॉमिक पुस्तक ज्यामध्ये नेपाळच्या कोपिशा या मुलीची कहाणी नोंदविलेली आहे, जे स्पष्टपणे बळजबरी, तस्करी, सोडवणूक व पुनर्वसन झालेले प्रकरण होते, तसेच स्थलांतराचे प्रश्न व लैंगिक कामगारांच्या सुरक्षिततेने फिरण्याचे प्रश्न देखील हाताळलेले आहेत.[43]

**----माझी आई घरवाली, तिचा मालक, त्याची बायको----** २००८ मध्ये व्यावसायिक रंगभूमीवरील गटांच्या मदतीने व्हॅम्प व मित्रा च्या सदस्यांनी केलेले नाटक जे सुषमा देशपांडे यांनी दिग्दर्शित केले होते. यात त्यांच्या आयुष्याच्या अनेक कहाण्या हर्ष, दुःख, विनोद व वेदनांसह सांगितलेल्या आहेत.

**----बळजबरीच्या विवाहांवरील अभ्यास ---** विरोधी संघटन या सहयोगी संस्थेने उत्तर कर्नाटकामध्ये लग्नाकरिता होणाऱ्या तस्करी वर केलेला एक प्रासंगिक अभ्यास ज्यामध्ये दलालांद्वारे रु.४०००० ते रु.९०००० पर्यंत किंमत देवून लग्नाकरिता नवऱ्या मुली विकत घेऊन दक्षिण महाराष्ट्रात नेण्यात येतात. जरी हे प्रसंग ज्ञात असले तरीही त्यांचे मूळ कारण शोधण्याकरिता कोणतेही सविस्तर संशोधन केले गेलेले नाही. एकदा त्या मुलींना आणल्यानंतर दलाल नाहीसे होतात व त्या मुलींना ज्या कुटुंबाने वाहतूक करून आणले असते त्यांच्या मर्जीवर सोडले जाते.

[43] येथे उपलब्ध : https://www.sangram.org/resources/Daughter-Of-The-Hills-Sangram.pdf

फसवणूक, कर्जाकरिता वेठबिगारी, गुलामी असे मानवी वाहतुकीचे सर्व ओळखीचे घटक या प्रकारामध्ये दिसून येतात, पण आवश्यक त्या गांभीर्याने हाताळले जात नाहीत, ज्याविषयी रचनात्मक अभ्यासंद्वारे आणखी खोलवर शोध घेण्याची व्हॅम्प व संग्राम यांची इच्छा आहे.

**५. मानवी तस्करी व लैंगिक काम तसेच मानवी तस्करी व असुरक्षित स्थलांतर यातील फरक स्पष्ट करण्याकरिता समर्थनात्मक काम**

लैंगिक कामगारांच्या संघटनांची राष्ट्रीय जाळेबांधणी - (National Network of Sex Workers Union (NNSW}, प्रशांत-आशियाई लैंगिक कामगारांची जाळेबांधणी the Asia-Pacific Network of Sex Workers (APNSW)}, व लैंगिक कामाच्या प्रकल्पांची जागतिक जाळेबांधणी {the Global Network of Sex Work Projects (NSWP)} या सारख्या व्यापक संधानांमधील सभासदत्वाद्वारे, व्हॅम्प व संग्राम स्थानिक, राष्ट्रीय व जागतिक अशा सर्व स्तरांवर सतत समर्थनात्मक कामही करत असतात. या व्यासपीठांद्वारे, त्या लैंगिक काम व मानवी तस्करी, तसेच मानवी तस्करी व अशी परिस्थिती ज्यात स्त्रिया स्वतःच्या मर्जीने, परंतु अनियमित पद्धतीने स्थलांतर करतात, यातील फरक ओळखण्यावर सतत भर देत असतात. "आमच्याशिवाय, आमच्याविषयी काही नाही" या मुलभूत तत्वाचा आधार घेऊन त्या नेहमीच मानवी तस्करी वरील चर्चांमध्ये लैंगिक कामगारांचे अनुभव व दृष्टीकोन यांचा समावेश होण्याकरिता समर्थन व सुलभीकरण करीत असतात.

सध्या, संग्राम व व्हॅम्प या दोन्ही संघटना, त्यांच्या राष्ट्रीय संधानाद्वारे, मानवी तस्करी (प्रतिबंध, संरक्षण व पुनर्वसन) कायदा आराखडा २००६, यातील त्रुटी अधोरेखित करण्याकरता एक व्यापक व तीव्र स्वरुपाची चर्चात्मक प्रक्रिया व समर्थन करण्यात गुंतलेल्या आहेत. लैंगिक कामगारांच्या व सहयोगी संस्थांच्या स्वाक्षऱ्या असलेला एक प्रतिसाद त्यांनी तयार केला आहे ज्यात त्या मांडतात:

"असमान वाढ, एकांगी विकास व असामायीकता यांच्याशी संबंधित प्रश्नांकडे, ज्यात रोजगार वाढविण्याकरिता स्थलांतराच्या इच्छेचाही समावेश असतो, मानवी तस्करी आराखडा दुर्लक्ष करतो. शिवाय, स्त्रियांकरिता स्थलांतर सुरक्षित होईल अशी परिस्थिती व कायदे निर्माण करण्यावर भर देण्याऐवजी, ही धोरणे स्त्रियांच्या चलनवलनाच्या हक्कावर मर्यादा आणण्यावरच भर देत आहेत. वेठबिगारीतून सुटका केलेल्यांना व अन्य परिस्थितींमधून (मातृरूप काम व लैंगिक काम) सुटका केलेल्यांना प्रत्यक्ष दिल्या जाणाऱ्या संरक्षणामध्ये दुहेरी हाताळणी दिसून येते, ज्याकडे लक्ष दिले पाहिजे व त्यास योग्य पद्धतीने हाताळले पाहिजे."[44]

त्यांनी आणखीही काही त्रुटींचा पुनरुच्चार केला- बालवाहतूक व प्रौढ वाहतूक यांचे कायदे निराळे करणे, स्वेच्छेने लैंगिक काम करणाऱ्या प्रौढ व्यक्तींना या कायदा आराखड्याच्या परिप्रेक्ष्यातून वगळणे, सुटका व पुनर्वसनामध्ये कोणत्याही प्रकारे हक्कांची पायमल्ली न होणे, ज्यात "पुनःपाठवणी" करण्याची, व सुटका केलेल्या व्यक्तीस तिची इच्छा काय आहे हे सांगण्याची संधी न देताच एका राज्यातून दुसऱ्या राज्यात पाठवून देण्याची कठोर तरतूद आहे. त्यांची मूळ मागणी हीच आहे की लैंगिक कामगारांच्या संघटना केवळ कायदा निर्माण करतांनाच नव्हे तर त्याची अंमलबजावणी करतांना देखील केंद्रस्थानी असल्या पाहिजेत.

---

[44] मानवी वाहतूक कायदा आराखाड्यावरील प्रतिक्रिया, vamp व संग्राम

'लैंगिक कामगारांच्या संस्था, संघटनांनी हे अनेकदा दाखवून दिले आहे की शोषणात्मक पद्धती मुळापासून दूर करण्याकरिता तसेच लैंगिक शोषणासाठी झालेली मानवी वाहतूक रोखण्याकरिता त्या सहजपणे सहयोग करतात. तरीही, प्रस्तावित समितीमध्ये त्यांना स्थान दिलेले नाही. असे प्रस्तावित केले आहे की जिल्हा पातळीवरील मानवी तस्करी विरोधी लढणाऱ्या कोणत्याही समितीमध्ये लैंगिक कामगारांचा व त्यांच्या संघटनांचा सहभाग व सल्लामसलत असली पाहिजे. अतिरिक्त सभासदांमध्ये जिल्हा पातळीवरील मानवी हक्क आयोगाचे प्रतिनिधी असावेत. अधिक समग्र दृष्टीकोन आणण्याकरिता यातील सामाजिक सेवक असलेल्या सदस्यांना केवळ मानवी-तस्करी -विरोधी कामाचाच अनुभव नसावा तर त्यासह स्त्रियांच्या प्रश्नांवर/सक्षमतेवर काम करण्याचा देखील अनुभव असावा. समितीमधील वकील सदस्यांना लैंगिक कामगार, संकटातील महिला, महिलाविरोधी हिंसा यासारख्या प्रश्नांवर कामाचा अनुभव असावा'.[45]

## शिफारशी

लैंगिक कामगारांची राष्ट्रीय जाळेबांधणी[46] चा घटक असलेल्या व्हॅम्प व इतर संस्था संघटनांनी मानवी तस्करी विषयी खालील शिफारशी केल्या आहेत, ज्या त्यांनी एप्रिल २०१३ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची स्त्रियांविरोधी हिंसेवरील विशेष अहवालकार भारतात आलेल्या असताना त्यांच्यासमोर सादर केलेल्या शिफारशींवरच आधारित आहेत.

**भारत सरकार करिता :**

१. लैंगिक कामाला गुन्हेगारीमुक्त दर्जा द्या ज्यायोगे लैंगिक कामगार मानवी वाहतूक व सर्व प्रकारच्या शोषणाचा सामना करण्याकरिता कायदेशीररीत्या साहाय्य करू शकतील.
२. मानवी तस्करी हा फौजदारी गुन्हा आहे आणि त्यास लैंगिक कामाशी जोडले जाऊ नये. प्रौढांची मानवी तस्करी व मुलांची मानवी तस्करी हाताळणारे कायदे निरनिराळे असावे ज्यायोगे स्वेच्छापूर्वक वागलेल्या प्रौढांना लहान मुलांप्रमाणे वागविले जाणार नाही व मुलांना न्याय मिळेल.
३. स्वेच्छापूर्वक वागणाऱ्या प्रौढांना लैंगिक काम विकणे किंवा विकत घेण्यापासून रोखणारे कायदे किंवा अन्य कोणतेही व्यावसायिक लैंगिक काम रोखणारे कायदे नाकारा, उदा. "अनैतिक" उत्पन्न विरोधी कायदा, वेश्याव्यवसायावर "पोट भरण्यास" किंवा वेश्यागृह चालविण्यास बंदी घालणारा कायदा. लैंगिक कामगारांच्या कामाच्या परिस्थितीच्या सुरक्षेकरिता पूरक कायदेशीर तरतुदी करा.
४. लैंगिक काम करणाऱ्या व्यक्ती किंवा लैंगिक अत्याचार झालेल्या मुलांसाठी असलेली सर्व सक्तीची निवारागृहे व पुनर्वसन केंद्रे बंद करण्यात यावीत. त्याऐवजी लैंगिक कामगारांकरिता परिणामकारकता सिद्ध झालेल्या, स्वैच्छिक समुदाय सक्षमता सेवा निर्माण कराव्यात. लैंगिक अत्याचार झालेल्या मुलांना सुरक्षित व सक्षम करणाऱ्या कौटुंबिक वातावरणात ठेवावे, ज्याची निवड मुलांचे सर्वाधिक हित ध्यानात घेऊन केलेली असेल.
५. लैंगिक शोषणाकरिता होणाऱ्या मानवी वाहतुकीकरिता धाड, सुटका, पुनःपाठवण व पुनर्वसन हेच प्रमुख व एकमेव धोरण ठेवण्याचा पुनर्विचार केला गेला पाहिजे. वाहतुकीचे बळी ठरलेल्यांना सकारात्मक कृतींमधून साहाय्य दिले गेले पाहिजे, उदा. वेठबिगारीचे उच्चाटन, कुटुंबांना कर्जाच्या चक्रातून मुक्त करणाऱ्या योजना, व त्यांची वंचितता व गरिबी दूर

[45] ibid

[46] पहा एनएसएसडब्ल्यू http://www.nnswindia.org/.

करण्याकरिता वस्तुरूप कर्जे ज्यायोगे त्यांचे सर्व प्रकारच्या सक्तीच्या श्रमांमध्ये ओढले जाणे कमी होईल.

६. सर्व स्थलांतरित व्यक्ती व त्यांच्या कुटुंबियांच्या हक्कांचा आंतरराष्ट्रीय जाहीरनामा, व आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या स्थलांतरित व्यक्तींशी संबंधित जाहिरनाम्यांवर सही करावी, ज्यायोगे ज्या स्त्रियांना काम करण्याकरिता राष्ट्रीय सीमारेषा ओलांडाव्या लागतात त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण होण्याची खातरजमा केली जाईल.

**न्यायालयीन अधिकाऱ्यांकरिता**

१. मानवी तस्करी विरोधी कायद्यांचा उपयोग लैंगिक शोषण रोखण्याकरिता केला जावा व ज्या व्यक्ती स्वेच्छेने लैंगिक काम करीत आहेत त्यांच्या विरोधात वापरले जाऊ नयेत.
२. सर्व प्रकारच्या बाल लैंगिक शोषण व लैंगिक अत्याचारांविरोधी असलेले कायदे योग्य प्रकारे अंमलात आणले जावे परंतु अशा प्रकारचे गुन्हे व स्वेच्छेने केलेले लैंगिक काम यांच्यात स्पष्टपणे फरक केला जावा.
३. सध्याचे दिवाणी व प्रशासकीय गुन्हे, उदा. “कामाशिवाय रेंगाळणे”, “सार्वजनिक उपद्रव”, व “सार्वजनिक नैतिकता” लैंगिक कामगारांना लागू केले जाणार नाहीत याची खातरजमा करावी.
४. न्यायमूर्ती वर्मा कमिशन ने विकसित केलेला भारतीय दंड विधान कलम ३७० चा अन्वयार्थ त्यामागील खऱ्या उद्देशानुसार अमलात आणला जावा. या समितीने सांगितल्याप्रमाणे या कलमाचा अर्थ स्वतःच्या व गिऱ्हाईकांच्या इच्छेने काम करणाऱ्या प्रौढ लैंगिक कामगारांना त्रास देण्याकरिता लावला जाऊ नये.
५. भारतीय दंड विधान कलम ३७० चा वापर प्रौढ लैंगिक कामगारांच्या गिऱ्हाइकांच्या विरोधात केला जाऊ नये.

**आर्थिक सहाय्य करणाऱ्या संस्थांकरिता**

१. लैंगिक कामगारांच्या समुदायांना मानवी तस्करी विरोधी कायद्यांचा त्यांच्या आयुष्यावर होणाऱ्या परिणामांविषयी संशोधन व माहिती गोळा करण्याच्या कामाकरिता साहाय्य द्यावे; या धंद्यांतर्गत असलेले शोषण व बळजबरी विरोधात लढणाऱ्या लैंगिक कामगारांच्या संघटनांच्या कामाच्या केस स्टडीज नोंदविल्या जाव्या.
२. लैंगिक शोषणाकरिता होणाऱ्या मानवी तस्करी विरोधात लढण्यासाठी सबळ नेतृत्व निर्माण करण्याची रणनीती म्हणून लैंगिक कामगारांच्या संस्था व संधानांना दीर्घकालीन साहाय्य देऊ करावे.
३. सहाय्य घेणाऱ्या सर्वांची मानवी हक्कांशी बांधिलकी असण्याचा आग्रह धरावा. दिलेल्या मदतीचा वापर, धाडी, सुटका व प्रौढ स्वैच्छिक लैंगिक कामगारांना सुरक्षागृहांमध्ये डांबून ठेवण्याकरिता व त्याद्वारे मानवी हक्कांची गंभीर प्रकारे पायमल्ली करण्याकरिता केला जाणार नाही याची योग्य काळजी घ्यावी.

**अंतिम निष्कर्ष**

प्रवास खडतर होता. परंतु प्रवासादरम्यान संघटन व स्वयं-संचलनाच्या सळसळत्या प्रक्रियेतून एका कलंकित व वंचित समुदायाला एका प्रस्थापित व वर्चस्ववादी नैतिक आणि न्यायिक व्यवस्थेला आव्हान देण्याचे बळ कसे मिळते याबद्दलची अधिक खोलवर समज मिळाली. तेही अशा व्यवस्थेला जिने मानवी वहातुक व लैंगिक काम यांचे एकत्रीकरण करून या समुदायास  शोषित व शोषणकर्ती, किंवा वाहतूक करणारी व होणारी, अशा द्वैतामध्ये इतिहासकाळापासून कैद करून ठेवले. आपला आत्मसन्मान परत मिळवून आणि आपली सत्यपरिस्थिती, आपले हक्क, आपले प्राक्तन याला आपल्या मनाप्रमाणे आकार देऊन, हे द्वैत मोडून काढण्याच्या प्रक्रियेचे मूल्य शैक्षणिक दृष्ट्या तसेच कार्यक्रम राबविण्याकरिताही महत्वाचे ठरते.

हिंसा, काम, रोजगार व पुनर्वसन या सर्वांची व्याख्या स्वतःच्या शब्दात व स्वतःच्या परिस्थितीच्या संदर्भात नव्याने करताना, त्यांनी केवळ त्यांच्यावर होणाऱ्या हिंसा व अन्यायाची मुळे शोधण्याचाच प्रयत्न केला असे नाही तर लैंगिक काम व मानवी तस्करी यांची पुनर्व्याख्या करून त्याभोवती असलेली नैतिक व कायदेशीर चौकात देखील अधिक रुंद केली. एकीकडे नैतिकतेच्या पुनः पुनः डोके वर काढणाऱ्या पारंपारिक कल्पना व नव्याने केलेले परंतु तितकेच बुरसटलेले कायदे व धोरणे यांजकडून अनेक दशके काम करून मिळविलेले यश पाण्यात जाण्याचा धोका असतानाही, दुसरीकडे निरनिराळ्या पातळ्यांवरील संघटन व स्वयं-संचलनाच्या प्रक्रियेमुळे समाजाकडून जाणवणाऱ्या या आव्हानांना तोंड देण्याचे धाडस व आत्मविश्वास या समुदायामध्ये निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसून येते.